# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ,नागपूर




# ई मासिक विद्यासंवाद

जुलै २०२४ | आवृत्ती–१३




# राष्ट्रसंत व्याख्यानमालेचा समारोप

विद्येअंगी व्हावा विनय। विद्या करी स्वतंत्र, निर्भय। शिक्षणाने वाढावा निश्चय। जीवन–जय करावया।।

ई मासिक विद्यासंवाद

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ १०० शताब्दी वर्ष १९२३ - २०२३

जुलै २०२४| आवृत्ती-१३

मार्गदर्शक
**डॉ. प्रशान्त बोकारे**
प्रभारी कुलगुरु
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ, नागपूर.

**डॉ. संजय दुधे**
प्र-कुलगुरु
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ, नागपूर.

प्रकाशक
**डॉ. राजू हिवसे**
कुलसचिव
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ, नागपूर.

संपादक
**श्री. प्रेमदास वाडकर**
जनसंपर्क अधिकारी
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ, नागपूर.

मुद्रक
**श्री. प्रवीण गोतमारे**
प्रकाशन अधिकारी
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ, नागपूर



मा. राज्यपाल
**श्री. सी. पी. राधाकृष्णन**



मा. प्रभारी कुलगुरु
**डॉ. प्रशान्त बोकारे**



मा. प्र-कुलगुरु
**डॉ. संजय दुधे**



मा. कुलसचिव
**डॉ. राजू हिवसे**

# समाजाला वसंतराव नाईक यांच्या दूरदृष्टीची गरज
# माजी कुलगुरू डॉ. शरद निंबाळकर यांचे प्रतिपादन
## विद्यापीठात माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांची जयंती कृषी दिन म्हणून साजरी







आज जरी आपण अन्नधान्याने परिपूर्ण असलो तरी आगामी काळात अन्नधान्याची कमतरता भासणार आहे. त्यामुळे समाजाला वसंतराव नाईक यांच्या दूरदृष्टीची गरज असल्याचे प्रतिपादन डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. शरद निंबाळकर यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या वतीने जमनालाल बजाज प्रशासकीय भवनातील सभागृहात महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांची जयंती कृषी दिन म्हणून सोमवार, दिनांक १ जुलै २०२४ रोजी साजरी करण्यात आली. या कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून डॉ. निंबाळकर मार्गदर्शन करीत होते.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान विद्यापीठाचे माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांनी भूषविले. प्रमुख वक्ते म्हणून डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला येथील माजी कुलगुरू डॉ. शरद निंबाळकर, कुलसचिव डॉ राजू हिवसे, अधिसभा सदस्य डॉ. विजय इलोरकर, वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. नितीन डोंगरवार यांची उपस्थिती होती. वीज कोठून येते, पिण्यास पाणी कोठून येते, हरितक्रांती म्हणजे काय? याची नवीन पिढीला माहिती व्हावी म्हणून माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या कार्याचे स्मरण आपण त्यांच्या जयंतीदिनी करीत असल्याचे डॉ. शरद निंबाळकर पुढे बोलताना म्हणाले. एक कुशल प्रशासक तसेच भारतातील कृषी क्रांतीला हातभार लावणारे हरीत क्रांती, धवलक्रांती आणि कृषी- औद्योगिक क्रांतीचे नाईक हे प्रणेते होते. ग्रामीण भागात वीज, पाण्याची सुविधा मिळावी म्हणून पंचायत राज या त्रिस्तरीय रचनेचे प्रणेते वसंतराव नाईक होते. त्यांनी ग्रामीण पाणीपुरवठा योजना सुरू केली. समाजाच्या खालच्या स्तरातून म्हणजेच वंचित घटकातून आलेले वसंतराव नाईक हे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे विद्यार्थी होते, असे अभिमानाने सांगत याचे आपणास भूषण असावे असे डॉ. निंबाळकर म्हणाले. 'एक एक पायरी चढत जावे, तुटक्या पायरी जवळ निराश होऊ नये, यशो मंदिर गाठावे आणि पहिल्या पायरीला विसरू नये', असे वसंतराव नाईक यांचे व्यक्तिमत्व होते, असे डॉ. निंबाळकर म्हणाले.

अध्यक्षीय भाषण करताना माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांनी आपणाकडे विद्यार्थ्यांच्या रूपाने मोठ्या प्रमाणात मनुष्यबळ आहे. या मनुष्यबळाचा वापर समाज अर्थात देश सेवेसाठी वापरता येईल, असे प्रकल्प शिक्षकांनी विद्यार्थ्यांना द्यावे असे आवाहन त्यांनी केले. स्थानिक समस्या शोधून त्यावर संशोधन करीत उपाय योजना कराव्या. या दृष्टीने नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार अभ्यासक्रम विद्यापीठाने तयार केले आहे. यातून विद्यार्थ्यांना स्थानिक स्तरावरील समस्यांबाबत संशोधन करता येईल. शासनाने गाव पातळीवर मोठ्या प्रमाणात अधिकार दिले आहेत. त्याचे अंमलबजावणीचे अधिकार देखील गावाला दिले आहे. त्यामुळे विद्यापीठाने मार्गदर्शकाची भूमिका निभवावी असे कुलगुरू म्हणाले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना वनस्पती शास्त्र विभाग प्रमुख डॉ. नितीन डोंगरवार यांनी कृषी दिन कार्यक्रम साजरा करण्यामागील पार्श्वभूमी सांगितली. अधिसभा सदस्य डॉ. विजय इलोरकर यांनी मनोगत व्यक्त करताना कृषी दिन विद्यापीठात साजरा व्हावा याबाबत प्रस्ताव पारित करून घेतल्याचे सांगितले. संचालन मराठी विभागातील डॉ. अमृता इंदूरकर यांनी केले तर आभार कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांनी मानले. कार्यक्रमाला अधिष्ठाता, विभाग प्रमुख, संचालक, अधिकारी, कर्मचारी तसेच विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

# ज्ञान मानवाचे परमधन - श्री. संकेत काळे
## राष्ट्रसंत व्याख्यानमालेचे बारावे पुष्प
### राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे आयोजन







ज्ञान हे मानवाचे परमधन असल्याचे प्रतिपादन श्री क्षेत्र रेवसा येथील माननीय श्री. संकेत काळे यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ शताब्दी महोत्सवाच्या निमित्ताने जमनालाल बजाज प्रशासकीय भवनातील सभागृहात सोमवार, दिनांक १५ जुलै २०२४ रोजी व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली. या व्याख्यानमालेत 'राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांना अपेक्षित विद्यार्थी आणि जीवन शिक्षण' या विषयावरील१२ वे पुष्प गुंफतांना श्री. काळे बोलत होते.

माननीय प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे, प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे यांच्या मार्गदर्शनाखाली व्याख्यानमालेचे अध्यक्षस्थान मानव विज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी यांनी भूषविले. व्याख्याते म्हणून अमरावती जिल्ह्यातील श्री क्षेत्र रेवसा येथील श्री. संकेत काळे, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज अध्यासन प्रमुख डॉ. विजयालक्ष्मी थोटे यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. संपूर्ण जगाने बोध घ्यावा, असा भारत देशात जन्माला आलेला प्रत्येक माणूस उच्च दर्जाचा सुसंस्कारित होता, असे वर्णन प्राचीन ग्रंथांमध्ये करण्यात आले आहे. भारतीय माणसाच्या ज्ञान तसेच वर्तनातून इतरांना शिकायला मिळत होते, असे पुढे बोलताना काळे म्हणाले. या देशात अनेक विद्वान विभूती तसेच महापुरुष जन्माला आले. त्यांच्यामुळे संपूर्ण जग ढवळून गेले असे वर्णन राष्ट्रसंतांनी त्यांच्या भजनातून केले आहे. राष्ट्रसंतांनी म्हटल्याप्रमाणे 'विद्येअंगी व्हावा विनय...' अशी निर्भयता, स्वतंत्रता निर्माण करणारी शिक्षण व्यवस्था हवी आहे. विद्यार्थ्यांना योग्य दिशा दाखविणारे शिक्षक हवे आहे. यावेळी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या विविध ठिकाणी केलेल्या भाषणांचा सारांश देत शिक्षणातून अपेक्षित असलेली पिढी निर्माण होण्याची अपेक्षा काळे यांनी व्यक्त केली.

मानव विज्ञान विद्या शाखा अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी यांनी अध्यक्षीय भाषण करताना दोन वर्षांपासून शताब्दी पर्व सुरू असल्याचे सांगितले. शताब्दी महोत्सव अंतर्गत राष्ट्रसंत व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले असून हे बारावे तसेच अंतिम पुष्प असल्याचे ते म्हणाले. विद्यापीठ शंभराव्या वर्षात कात टाकत आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांना अपेक्षित असलेले शिक्षण नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या माध्यमातून विद्यापीठाने लागू केले असल्याचे डॉ. कोरेटी यांनी सांगितले. प्रास्ताविक करताना राष्ट्रसंत तुकडोजी महाराज अध्यासन प्रमुख डॉ. विजयालक्ष्मी थोटे यांनी व्याख्यानमालेतील हे अंतिम पुष्प असल्याचे सांगितले. राष्ट्रसंतांच्या या तत्त्वज्ञानातून विद्यापीठाने 'रिचिंग टू अनरीच्ड' असे ग्राम चलो अभियान सुरू केल्याचे डॉ. थोटे यांनी सांगितले. व्याख्यानमलेचे संचालन करीत आभार डॉ. देवमण कामडी यांनी मानले. कार्यक्रमाला मोठ्या संख्येने शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी तसेच गुरुदेवभक्त उपस्थित होते.





## प्रभारी कुलगुरू म्हणून डॉ. प्रशान्त बोकारे यांनी स्वीकारला पदभार

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू म्हणून डॉ. प्रशान्त बोकारे यांनी शुक्रवार, दिनांक ५ जुलै २०२४ रोजी पदभार स्वीकारला.

गोंडवाना विद्यापीठाचे माननीय कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे यांना माननीय राज्यपाल कार्यालयाकडून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू म्हणून पदाची सूत्रे सांभाळण्याचे आदेश प्राप्त झाले. त्यामुळे डॉ. प्रशान्त बोकारे यांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू म्हणून पदभार स्वीकारला. यावेळी कुलसचिव डॉ. राजू हिवसे, परीक्षा व मूल्यमापन मंडळ संचालक डॉ. प्रफुल्ल साबळे, वित्त व लेखा अधिकारी श्री. हरीश पालीवाल, उपकुलसचिव श्री. संजय बाहेकर, श्री प्रदीप बिनीवाले, श्री गणेश कुमकुमवार यांच्यासह अन्य उपस्थित होते.

## दिघोरीत सुरू होणार कौशल्य विकास केंद्र
### राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा उपक्रम





शहरातील दिघोरी परिसरात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाकडून कौशल्य विकास केंद्र सुरू केले जात आहे. कौशल्य विकास केंद्र मार्फत मिळणाऱ्या प्रशिक्षणातून युवकांना रोजगार तसेच स्वयंरोजगाराचे द्वार खुले होणार आहे. आयसीआयसीआय फाऊंडेशन यांच्या मदतीने विद्यापीठाकडून हे कौशल्य विकास केंद्र लवकरच सुरू केले जाणार आहे.

दिघोरी येथे पूर्वी विधी महाविद्यालय असलेल्या इमारतीत कौशल्य विकास केंद्र सुरू केले जात आहे. माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांनी दिलेल्या सूचनेप्रमाणे विद्यापीठाच्या रोजगार व प्रशिक्षण विभागामार्फत कौशल्य विकास केंद्र निर्मितीचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. विद्यापीठाच्या शताब्दी महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांच्या संकल्पनेतून 'रीचिंग टू अनरीच्ड' या अभियान अंतर्गत कौशल्य विकास केंद्राची निर्मिती करण्यात आली आहे. या ठिकाणी संगणक लॅब पूर्ण झाली आहे तर सोलर पॅनल लॅब तयार होत आहे. विद्यापीठ आजीवन अध्ययन व विस्तार विभागाकडून या कौशल्य प्रशिक्षण केंद्रात संगणकाबाबत विविध प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू केले जात आहे. त्याचप्रमाणे सोलर पॅनल निर्मिती ते ग्राहकांना वापराकरिता लावून देण्याबाबत संपूर्ण प्रशिक्षण अभ्यासक्रमाच्या माध्यमातून दिले जाणार आहे. विद्यापीठाचे रोजगार व प्रशिक्षण अधिकारी डॉ. भूषण महाजन यांच्या देखरेखीखाली कौशल्य विकास केंद्र पूर्णत्वास येत आहे.

### सीएसआर निधीतून लॅब निर्मित

विद्यार्थ्यांना रोजगार व स्वयंरोजगाराचे प्रशिक्षण मिळावे म्हणून आयसीआयसीआय फाऊंडेशनच्या सीएसआर नागपूर सेंटरच्या प्रमुख रिचा सिंह यांनी कौशल्य विकास केंद्र निर्मितीत मोलाचे सहकार्य दिले आहे. फाऊंडेशनच्या सीएसआर फंडातून कौशल्य विकास केंद्र करिता संपूर्ण फर्निचरसह ४० संगणक त्याचप्रमाणे संपूर्ण सोलर लॅब विद्यापीठाला प्राप्त होणार आहे.

### प्रशिक्षणासाठी ४ क्लासरूम

दिघोरी येथील कौशल्य विकास केंद्रात संगणक प्रशिक्षण लॅब तयार झाली असून सोलर पॅनल लॅबचे काम अंतिम टप्प्यात आहे. दोन लॅब तसेच एकूण ४ क्लासरूम तयार करण्यात आल्या आहेत. या ४ क्लासरूमच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना प्रशिक्षित केले जाणार आहे.

### मुलाखत कौशल्य विकसित करणार

संगणक आणि सोलर पॅनल लॅब व्यतिरिक्त या कौशल्य विकास केंद्रातून विद्यार्थ्यांना मुलाखत कौशल्य वृद्धिंगत करण्याची संधी मिळणार आहे. नांदी फाउंडेशनच्या माध्यमातून मुलाखत कौशल्य वृद्धिंगत करणारे सॉफ्ट स्किल अभ्यासक्रम देखील या ठिकाणी सुरू केले जाणार असल्याची माहिती विद्यापीठाचे रोजगार व प्रशिक्षण अधिकारी डॉ. भूषण महाजन यांनी दिली आहे.

## शताब्दी महोत्सवाचा समारोप होणार अविस्मरणीय
## माजी शिक्षक, अधिकारी- कर्मचारी तसेच माजी विद्यार्थ्यांचा होणार मेळावा
## पूर्वतयारी बैठकीत माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांनी घेतला आढावा





राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ शताब्दी महोत्सवी वर्षाचा समारोपीय कार्यक्रम अविस्मरणीय होणार आहे. ऑगस्ट महिन्याच्या पहिल्या आठवड्यात आयोजित कार्यक्रमात माजी शिक्षक, कर्मचारी तसेच माजी विद्यार्थी मेळावा होणार आहे. कार्यक्रमाच्या अनुषंगाने पूर्वतयारी बैठक जमनालाल बजाज प्रशासकीय भवनातील सभागृहात बुधवार, दिनांक ३ जुलै २०२४ रोजी पार पडली. या बैठकीत माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांनी तयारीचा आढावा घेतला.

बैठकीच्या अध्यक्षस्थानी माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी होते तर. यावेळी विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. प्रशांत माहेश्वरी, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. संजय कवीश्वर, मानव विज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी, आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. प्रशांत कडू यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. यावेळी मार्गदर्शन करताना कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांनी वैद्यकीय, अभियांत्रिकी त्याचप्रमाणे औषधी निर्माणशास्त्र विभागातील माजी विद्यार्थी मेळाव्याला उपस्थित राहणार असल्याचे सांगितले. या सोबतच सर्व शैक्षणिक विभागांनी त्यांच्या विभागातील नामवंत असलेल्या माजी विद्यार्थ्यांची माहिती गोळा करण्याचे आवाहन केले. २ ऑगस्ट रोजी माजी शिक्षक, कर्मचारी तर ३ ऑगस्ट रोजी माजी विद्यार्थी मेळावा आयोजित होणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले. सामाजिक तसेच विविध क्षेत्रात नामांकित असलेल्या माजी विद्यार्थ्यांच्या हस्ते विभागाच्या वतीने या कार्यक्रमात वृक्षारोपण देखील करण्याचे नियोजन आहे. माजी विद्यार्थी, माजी शिक्षक, कर्मचारी यांची संभाव्य उपस्थिती आणि त्यांच्या नियोजनाबाबत बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. पूर्व तयारी बैठकीला विविध शैक्षणिक विभागांचे विभाग प्रमुख, संचालक व अधिकारी उपस्थित होते. सर्व उपस्थितांचे आभार अधिष्ठाता डॉ. संजय कवीश्वर यांनी मानले. बैठकीचे यशस्वी नियोजन शताब्दी महोत्सव कक्षाचे विशेष कार्य अधिकारी श्री प्रदीप बिनीवाले यांनी केले.

# नामवंत माजी विद्यार्थ्यांचा विद्यापीठ करणार सन्मान

## शताब्दी महोत्सवात माजी विद्यार्थी मेळाव्याची जय्यत तयारी

### पूर्वतयारीचा माननीय प्र-कुलगुरूंनी घेतला आढावा





राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ नामवंत अशा माजी विद्यार्थ्यांचा सन्मान करणार आहे. शताब्दी महोत्सवी वर्ष समारोपीय कार्यक्रमाच्या निमित्याने माजी विद्यार्थी मेळाव्याचे आयोजन केले जाणार आहेत. या माजी विद्यार्थी मेळाव्याची जय्यत तयारी सुरू आहे. याबाबत जमनालाल बजाज प्रशासकीय भवनातील सभागृहात मंगळवार, दिनांक ९ जुलै २०२४ रोजी पार पडलेल्या बैठकीत माननीय प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे यांनी आढावा घेतला.

बैठकीच्या अध्यक्षस्थानी माननीय प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे तर प्रमुख अतिथी म्हणून माजी विद्यार्थी मेळावा समिती सचिव डॉ. कल्पना पांडे, प्रभारी विद्यार्थी विकास विभाग प्रमुख डॉ. राजेश सिंह, शताब्दी महोत्सव कक्षाचे सहसमन्वयक डॉ. संतोष कसबेकर, डॉ. अनंत पांडे, श्री प्रमोद तिजारे यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ शताब्दी महोत्सवी वर्षाचा समारोपीय कार्यक्रम ऑगस्ट महिन्याच्या पहिल्या आठवड्यात आयोजित आहे. या कार्यक्रमात माजी शिक्षक, कर्मचारी तसेच माजी विद्यार्थी मेळावा होणार आहे.

यावेळी मार्गदर्शन करताना माजी विद्यार्थी मेळावा समिती सचिव डॉ. कल्पना पांडे यांनी मेळावा आयोजित करण्याबाबत माहिती दिली. १०० वर्ष पूर्ण झालेल्या विद्यापीठाचे माजी विद्यार्थी समाजाच्या विविध घटकात कार्यरत असल्याचे त्यांनी सांगितले. अनेक नामवंत विद्यार्थ्यांनी विद्यापीठाचा नावलौकिक वाढविला आहे. शताब्दी महोत्सवी वर्षात त्यांचा येथोचित सन्मान होणे गरजेचे असल्याने या मेळाव्याचे आयोजन असल्याचे त्यांनी सांगितले. मोठ्या संख्येने माजी विद्यार्थी या मेळाव्यामध्ये सहभागी होण्याची शक्यता असल्याने सर्व विभागांनी त्या दृष्टीने तयारी करावी अशा सूचना त्यांनी दिल्या. विभागाशी संबंधित माजी विद्यार्थी सहभागी होत असल्यास त्यांची संपूर्ण माहिती गोळा करण्याबाबत यावेळी सूचित करण्यात आले. प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे यांनी मार्गदर्शन करताना मेळाव्याच्या निमित्ताने माजी विद्यार्थी येणार असल्याने विभाग विकासाच्या दृष्टीने आराखडा तसेच संकल्पना तयार ठेवण्याचे आवाहन केले. शताब्दी महोत्सवाच्या समारोपीय कार्यक्रमाच्या निमित्ताने सहभागी होणाऱ्या माजी विद्यार्थ्यांच्या सहभागातून विद्यापीठाचा विकास झाला पाहिजे या दृष्टीने नियोजन करण्याचे आवाहन त्यांनी केले.

माजी विद्यार्थ्यांच्या नोंदणीबाबत विद्यापीठाच्या संकेतस्थळावर लिंक उपलब्ध करून देण्यात आल्याची माहिती डॉ. संतोष कसबेकर यांनी दिली. मेळाव्याचे नियोजन करीत असताना कोणतीही उणीव रहायला नको, असे डॉ. अनंत पांडे यांनी सांगितले. उत्कृष्ट शास्त्रज्ञ तसेच संशोधनाच्या दृष्टीने आवश्यक असलेल्या उपकरणांची यादी तयार करण्याचे आवाहन त्यांनी विभाग प्रमुखांना केले. बैठकीचे आभार प्रभारी विद्यार्थी विकास प्रमुख डॉ. राजेश सिंह यांनी मानले. बैठकीचे यशस्वी नियोजन शताब्दी महोत्सव कक्षाचे विशेष कार्य अधिकारी श्री प्रदीप बिनीवाले यांनी केले. बैठकीला सर्व शैक्षणिक विभाग प्रमुख, संचालक उपस्थित होते.

# वकिली समाजात आदर देणारा पेशा
# न्यायमूर्ती वृषाली जोशी यांचे प्रतिपादन
# डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालयात पदवी वितरण सोहळा







वकिली हा समाजात आदर देणारा पेशा असल्याचे प्रतिपादन उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती वृषाली जोशी यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालयाचा पदवी वितरण समारंभ महाराज बाग स्थित दीक्षांत सभागृहात, शनिवार दिनांक ६ जुलै २०२४ रोजी पार पडला. या कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून न्यायमूर्ती जोशी यांनी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती वृषाली जोशी, महाराष्ट्र व गोवा बार असोसिएशनचे सदस्य ॲड. पारिजात पांडे, विद्यापीठ आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. प्रशांत कडू, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रविशंकर मोर यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. विधी क्षेत्रामध्ये यशस्वी होण्यासाठी शैक्षणिक उत्कृष्टता असण्यासोबतच अनुभवाची जोड आवश्यक असल्याचे न्यायमूर्ती जोशी पुढे बोलताना म्हणाल्या. विधीक्षेत्रात येण्याचे आपले अनुभव विशद करताना त्यांनी सांगितले की त्यांचे वडील संस्कृत विषयाचे गाढे अभ्यासक होते. मात्र, त्यांच्या वडिलांनी दिलेल्या प्रेरणेमुळे विधीक्षेत्रात प्रवेश करता आला. न्यायाधीश म्हणून निवड झाल्यानंतर पालकांना झालेल्या विशेष आनंदाचे क्षण त्यांनी कथन केले. पालकांचे पाठबळ आपणास बळ देत असून गोंधळून न जाता आयुष्यात पालकांकडून मार्गदर्शन घेण्याचे आवाहन त्यांनी केले. कोणत्याही क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी कठीण प्रयत्नांची गरज असते, त्याकरिता आतापासूनच सुरुवात करा. सोबतच यशस्वी जीवनाचा मंत्र न्यायमूर्ती जोशी यांनी विद्यार्थ्यांना दिला. विधी क्षेत्रातील अनेक दिग्गजांना घडविणाऱ्या महाविद्यालयात पदवी वितरण समारंभ कार्यक्रमास बोलाविल्याने त्यांनी आयोजकांचे आभार मानले.

ॲड. पारिजात पांडे यांनी मार्गदर्शन करताना आता केवळ अभ्यासक्रम पूर्ण झाला असून खऱ्या शिक्षणास सुरुवात झाली असे सांगितले. या महाविद्यालयाला फार मोठी परंपरा असल्याचे सांगत विद्यार्थी जीवनातील विविध घटनांना त्यांनी उजाळा दिला. विधी शाखेतून पदवी प्राप्त विद्यार्थ्यांना त्यांनी शुभेच्छा दिल्या. यावेळी मार्गदर्शन करताना आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्या शाखा अधिष्ठाखा डॉ. प्रशांत कडू यांनी समाजातील गरजा लक्षात घेऊन विधी क्षेत्रातील समस्यांचे निराकरण करण्याचे आवाहन विद्यार्थ्यांना केले. भारत हा जगामध्ये सर्वाधिक तरुण लोकसंख्येचा देश असून त्याचा विनियोग देशाला महासत्ता बनविण्यासाठी व्हायला हवा, असे त्यांनी सांगितले. महात्मा गांधी यांचा सत्य व अहिंसा हा संदेश त्यांनी त्यांच्या भाषणातून दिला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रवीशंकर मोर यांनी महाविद्यालयातील प्रवेश ते पदवी घेण्यापर्यंतचा विद्यार्थ्यांचा प्रवास उलगडून सांगितला. प्रमुख अतिथी न्यायमूर्ती वृषाली जोशी यांचा परिचय त्यांनी करून दिला. न्यायमूर्ती जोशी यांच्या शुभहस्ते गुणवंत विद्यर्थिनी सोनल भार्गव आणि अक्षता ब्राम्हपुरीकर यांना त्यांच्या आईच्या स्मृतीप्रित्यर्थ प्रत्येकी स्मृतीचिन्ह आणि १०,००० रूपये रोख रक्कम बक्षीस म्हणून देण्यात आली. कार्यक्रमांमध्ये प्रमुख अतिथींच्या हस्ते महाविद्यालयातील गुणवंतांचा सत्कार करीत अन्य विद्यार्थ्यांना पदवी वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन हर्षिता पांडे यांनी केले तर आभार डॉ. प्रवीणा खोब्रागडे यांनी मानले. कार्यक्रमाला डॉ.अधरा देशपांडे, डॉ. चिन्मयी निमखेडकर, प्रा. मृण्मयी कुकडे, प्रा. अर्चना प्रांजळे, प्रा. प्रवीणा उराडे, प्रा. ममता गोमासे यांच्यासह शिक्षक कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.







# युवकांना कठोर परिश्रमाची सवय लावणे काळाची गरज
## माजी शिक्षण संचालक डॉ.गोविंद नांदेडे यांचे प्रतिपादन
## विद्यापीठात महात्मा बसवेश्वर व्याख्यानमाला

महात्मा बसवेश्वर यांनी त्यांच्या साहित्यातून कायाकवे कैलास ( कठोर परिश्रमाचा) सिद्धांत सांगितला असून आजच्या युवकांना कठोर परिश्रमाची सवय लावणे काळाची गरज असल्याचे प्रतिपादन माजी शिक्षण संचालक डॉ. गोविंद नांदेडे यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या महाराज बाग स्थित दीक्षांत सभागृहात शुक्रवार, दिनांक १२ जुलै २०२४ रोजी कै. दादा मनोहरराव कल्लावार स्मृतिप्रित्यर्थ महात्मा बसवेश्वर व्याख्यानमाला पार पडली. या व्याख्यानमालेत 'महात्मा बसवेश्वरांच्या कार्याची सद्यस्थितीतील उपयुक्तता' या विषयावर माजी संचालक डॉ. नांदेडे यांनी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मानव विज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. श्यामराव कोरेटी होते, व्याख्याते म्हणून माजी शिक्षण संचालक डॉ. गोविंद गणाजी नांदेडे व शिवा अखिल भारतीय वीरशैव युवक संघटनेचे राष्ट्रीय उपाध्यक्ष श्री. अभय कल्लावार यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. अश्या प्रकारची व्याख्यानमाला आयोजित करणारे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ हे भारतातील पहिले विद्यापीठ असल्याचे कौतुकास्पद उद्गार डॉ. नांदेडे यांनी पुढे बोलताना काढले. भारतामध्ये गौतम बुद्ध यांच्यानंतर पुरोगामी विचाराचे दुसरे प्रचारक म्हणून महात्मा बसवेश्वर यांचे नाव आहे, असे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांगतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लाखो अनुयायांना बुद्ध धम्माची दीक्षा देऊन धम्मक्रांती घडविली. तशीच महात्मा बसवेश्वरांनी वीरशैव लिंगायत धर्माची दीक्षा आठशे वर्षांपूर्वी दिली असल्याचे डॉ. नांदेडे यांनी यावेळी सांगितले. बसवेश्वरांनी आयुष्यभर जातीभेद नष्ट करण्याचे काम केले. जातीभेदाने पोखरलेल्या समाजाला १२ व्या शतकात जागृत करण्याचे धाडसाचे काम महात्मा बसवेश्वर यांनी केले. एकविसाव्या शतकात आजही आंतरजातीय विवाहाला विरोध आहे. त्यातून ऑनर किलिंग सारख्या घटना घडल्या आहेत. महात्मा बसवेश्वरांनी त्याकाळी १२ व्या शतकातच आंतरजातीय विवाह घडवून आणला होता. त्यावेळी त्यांना विरोध झाला होता. जातीअंताचे पहिले प्रयत्न तथागत गौतम बुद्धांनी केले. समाजात शांती, समता, बंधुता नांदावी हे बुद्धांचे महान विचार आहेत. बसवेश्वरांचे सुद्धा जातीभेद नष्ट करण्यासाठी प्रयत्न राहिलेले आहेत, असे डॉ. नांदेडे म्हणाले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना शिवा अखिल भारतीय वीरशैव युवक संघटनेचे राष्ट्रीय उपाध्यक्ष अभय कल्लावार यांनी महात्मा बसवेश्वर यांनी बाराव्या शतकात व्यवस्थेविरुद्ध आवाज उठविला असून त्यांचे कार्य लोकांपर्यंत पोहचविण्याची गरज असल्याचे मत व्यक्त केले. शिवाय माणूस घडविण्याचे कार्य विद्यापीठातून झाले पाहिजे, असे ते म्हणाले. अध्यक्षीय भाषण करताना कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी यांनीही महात्मा बसवेश्वर यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला. प्रमुख व्याख्याते यांचा परीचय डॉ. कविता मते यांनी करुन दिला. या व्याख्यानमालेचे संचालन अरुणा भोंडे यांनी केले तर आभार प्रा. सुषमा कल्लावार यांनी मानले.




# साहित्य काळ आणि समाजाचा हृदयाचा ठोका

## इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ दिल्ली येथील डॉ. जितेंद्र श्रीवास्तव यांचे प्रतिपादन विद्यापीठ हिंदी विभागात विशेष व्याख्यान

साहित्य तत्कालीन काळ आणि समाजाच्या हृदयाचा ठोका असतो, असे प्रतिपादन इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ दिल्ली येथील डॉ. जितेंद्र श्रीवास्तव यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या हिंदी विभागात 'आपला काळ, समाज आणि साहित्य' या विषयावर शनिवार, दिनांक २० जुलै २०२४ झालेल्या विशेष व्याख्यानात डॉ. श्रीवास्तव बोलत होते.

हिंदी विभागात आयोजित कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ दिल्ली येथील डॉ. जितेंद्र श्रीवास्तव, विभाग प्रमुख डॉ. मनोज पांडे, वीएनआयटी राजभाषा अधिकारी एस.पी. सिंह यांची उपस्थिती होती. लेखकाला व्यापक सामाजिक चिंता असणे हा साहित्य निर्मितीचा पहिला निकष असल्याचे डॉ. श्रीवास्तव पुढे बोलताना म्हणाले. लेखक जितक्या सखोलपणे आणि बारकाईने त्याचा काळ आणि समाज समजून घेतो, तितकेच त्याचे कार्य अधिक समर्पक आणि महत्त्वाचे असल्याचे सिद्ध होते. साहित्याने केवळ वेळेचे मूल्यमापन न करता वेळ आणि समाज समजून घेण्याचा दृष्टिकोन विकसित करणे अपेक्षित असल्याचे श्रीवास्तव म्हणाले.

प्रास्ताविक करताना हिंदी विभाग प्रमुख डॉ. मनोज पांडे म्हणाले की, साहित्याचे काम वाचकाचा विवेक जागृत करणे असल्याचे पांडे म्हणाले. चर्चेत भाग घेताना व्हीएनआयटीचे राजभाषा अधिकारी एस.पी. सिंग म्हणाले की, साहित्याकडे सामाजिक माध्यम म्हणून पाहिले पाहिजे. हिंदी विभागाचे सहयोगी प्राध्यापक डॉ. संतोष गिन्हे यांनी साहित्य हे समाजाचे विश्वसनीय माध्यम असल्याचे सांगून काळाच्या मागणीनुसार महत्त्वाचे साहित्य आपोआप निर्माण होत असल्याचे सांगितले. आयकर विभागाचे सहाय्यक संचालक (राजभाषा) अनिल त्रिपाठी यांनी आपले विचार मांडताना साहित्याची सामाजिक भूमिका अधोरेखित केली. डाक संचालनालयाचे हिंदी अधिकारी तेजवीर सिंग यांनी सामाजिक विसंगती साहित्यासाठी चिंतेची बाब असल्याचे वर्णन केले. डॉ.लखेश्वर चंद्रवंशी यांनी साहित्यिकांची जबाबदारी अधोरेखित केली. डॉ. सुमित सिंग यांनी संचालन करताना आजच्या साहित्याच्या स्थितीवर प्रकाश टाकला. यावेळी प्रा. जागृती सिंह, प्रा.अनुश्री सिन्हा, प्रा. दामोदर द्विवेदी, प्रा. विनय उपाध्याय, ज्ञानेश्वर भेलकर यांच्या सह संशोधक, विद्यार्थी उपस्थित होते.



# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात लोकमान्य बाळ गंगाधर टिळक जयंती

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. जमनालाल बजाज प्रशासकीय भवनातील सभागृहात मंगळवार, दिनांक २३ जुलै २०२४ रोजी झालेल्या कार्यक्रमात शताब्दी महोत्सव कक्षाचे विशेष कार्य अधिकारी श्री प्रदीप बिनीवाले व सामान्य प्रशासन विभागाचे सहाय्यक कुलसचिव श्री गणेश कुमकुमवार यांच्या शुभहस्ते लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या प्रतिमेस मार्ल्यापण करण्यात आले. यावेळी जनसंपर्क अधिकारी प्रेमदास वाडकर, यूडीसी श्री शैलेश राठोड, सर्वश्री मनोज मोरे, नितीन खरबडे, योगेश केवटे, रुपेश आतराम, कवडू भोयर, नरेंद्र पवार, अनिल खरे, कार्तिक हरडे, शितल शेटे, आसिफ शेख यांच्यासह अन्य उपस्थित होते.

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात प्लेसमेंट ड्राईव्ह
## विविध पदांकरिता विद्यार्थ्यांनी दिल्या मुलाखती





राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात प्रोव्हिंसियल लाईफस्टाईल रिटेल सर्विसेस नागपूर या कंपनीच्या वतीने प्लेसमेंट ड्राईव्ह घेण्यात आला. महाराज बाग स्थित विद्यापीठाच्या दीक्षांत सभागृहात हा प्लेसमेंट ड्राईव्ह शुक्रवार, दिनांक २६ जुलै २०२४ रोजी पार पडला. माननीय प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे यांनी उपस्थित राहत मुलाखतीसाठी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

प्रोव्हिंसिअल लाईफस्टाईल रिटेल सर्विसेस या कंपनीकडून रिटेल सेल्स एक्झिक्यूटिव्ह, कॅशियर जनसंपर्क अधिकारी, ऑपरेशन एक्झिक्युटव्ह (ट्रॅव्हल टुरिझम) या पदांकरिता हा प्लेसमेंट ड्राईव्ह राबविण्यात आला. प्लेसमेंट ड्राईव्ह करिता एकूण १३८ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती तर ६० विद्यार्थी प्रत्यक्ष उपस्थित होते. कंपनीच्या एचआर संजीवनी कटांगडे व वर्षा झा यांच्याकडून मुलाखत प्रक्रिया राबविण्यात आली. यावेळी विद्यापीठाचे रोजगार व प्रशिक्षण अधिकारी डॉ. भूषण महाजन यांची उपस्थिती होती. मुलाखतीनंतर रिटेल सेल्स एक्झिक्यूटिव्ह पदाकरिता १०, कॅशियर पदाकरिता ३, जनसंपर्क अधिकारी एक व ऑपरेशन एक्झिक्युटव्ह (ट्रॅव्हल टुरिझम) एक उमेदवाराची निवड केली





# प्राणीशास्त्र विभागात 'वर्मीकंपोस्टिंग युनिट' स्थापन
## वर्मीकंपोस्टिंग बाबत कार्यशाळेचे आयोजन

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पदव्युत्तर प्राणीशास्त्र विभागात 'वर्मीकंपोस्टिंग युनिट' स्थापन करण्यात आले. प्राणीशास्त्र विभागाने सोमवार, २२ आणि मंगळवार, २३ जुलै २०२४ रोजी या विषयावर कार्यशाळा आयोजित केली.

प्राणीशास्त्र विभागात आयोजित कार्यशाळेत वर्मीकल्चर आणि वर्मीकंपोस्टिंग युनिट कसे स्थापन करावे याबाबत वर्धा जिल्ह्यातील सेलू येथील डॉ. आर. जी. भोयर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या पदव्युत्तर प्राणीशास्त्र विभागातील सहाय्यक प्राध्यापिका डॉ. वैशाली बडवाईक यांनी माहिती दिली. या कार्यशाळे अंतर्गत प्राणीशास्त्र विभागाच्या प्रांगणात दोन वर्मी कंपोस्टिंग बेड्स स्थापन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्रा. एस. सी. मासराम यांनी भूषवले. यावेळी विभाग प्रमुख डॉ. (श्रीमती) व्हि.टी. धुर्वे यांची उपस्थिती होती. विभागप्रमुख डॉ. धुर्वे यांनी डॉ. वैशाली बडवाईक यांचे स्वागत केले. शैक्षणिक विभागातील सर्व कर्मचारी, संशोधक व एम.एस्सी. विद्यार्थ्यांनी वर्मीकंपोस्टिंग बेड्सच्या स्थापनेत सहभाग घेतला. या कार्यशाळेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना एक विशेष कौशल्य प्राप्त होईल, ज्यामुळे भविष्यात त्याचा उपयोग होईल. कार्यशाळेदरम्यान "वर्मीकल्चर आणि वर्मीकंपोस्टिंग" या विषयावर एक अतिथी व्याख्यान आयोजित करण्यात आले. या व्याख्यानात डॉ. वैशाली बडवाईक यांनी विद्यार्थ्यांना समाज व शेतकऱ्यांमध्ये वर्मीकंपोस्टचा जैविक खत म्हणून उपयोगाबद्दल जागरूकता निर्माण करण्याचे आवाहन केले.




# विद्यापीठात आंतरराष्ट्रीय व्याघ्र दिवस उत्साहात प्रवास व पर्यटन विभागाचे आयोजन

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात आंतरराष्ट्रीय व्याघ्र दिवस सोमवार, दिनांक २९ जुलै २०२४ रोजी उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यापीठाच्या प्रवास व पर्यटन विभागाच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

नागपूर ही भारतातील वाघांची राजधानी असून विदर्भातील ताळोबा, पेंच, उमरेड करांडला, बोर, नागझिरा, मेळघाट ही व्याघ्रप्रकल्प वाघांचे संवर्धन करण्यात महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. या अनुषंगाने वाघांचे पर्यटन क्षेत्रातील महत्त्व, त्यांना बघावयास येणारा राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पर्यटक आणि या पर्यटनातून विदर्भाचा होणारा विकास यांना लक्षात घेता प्रवास व पर्यटन विभाग दर वर्षी व्याघ्र दिवस साजरा करतो असे विभाग प्रमुख डॉ. प्रियदर्शि खोब्रागडे यांनी आपल्या भाषणात विद्यार्थ्यांना संबोधित केले. तसेच पदवी तृतीय सेमीस्टर मधील विद्यार्थी नरेश मेश्राम, दीपक उके आणि रामदास बागडे यांनी व्याघ्र दिनाचे महत्त्व, भारतातील व्याघ्र प्रकल्प, त्या संदर्भातील शासकीय योजना, विदर्भातील व्याघ्र प्रकल्प आणि वाघांची संख्या तसेच पर्यटक आणि त्यांच्यासाठी उपलब्ध सुविधा या विषासंदर्भात माहिती दिली. या कार्यक्रमाला यशस्वी करण्यात प्रा. मंजुषा डोंगरे, प्रा. शोभना मेश्राम, प्रा. डॉ. अमरदीप बारसागडे, प्रा. परिमल सुरडकर यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.







# आंतरराष्ट्रीय व्याघ्र दिनानिमित्त विविध कार्यक्रम

## विद्यापीठ प्राणीशास्त्र विभाग आणि महाराजबाग प्राणी संग्रहालयाचे आयोजन

आंतरराष्ट्रीय व्याघ्र दिवसाचे औचित्य साधून महाराज बाग प्राणी संग्रहालय येथे विविध कार्यक्रमाचे आयोजन सोमवार, दिनांक २९ जुलै २०२४ रोजी करण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा प्राणीशास्त्र विभाग, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, महाराज बाग प्राणी संग्रहालय आणि कमला नेहरू महाविद्यालय नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ. पी. आर. कडू यांनी भूषविले. प्रमुख अतिथी म्हणून महाराष्ट्र राज्य वन्यजीव मंडळाचे सदस्य श्री कुंदन हाते, विद्यापीठ प्राणिशास्त्र विभाग प्रमुख डॉ. (सौ.) व्हि. टी. धुर्वे, महाराज बाग प्राणी संग्रहालयाचे अधिकारी डॉ. एस. एस. बावस्कर यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. श्री. कुंदन हाते यांनी त्यांच्या भाषणात वाघांचे संरक्षण आणि या भव्य प्राण्यांचे संरक्षण करण्याच्या महत्वावर जागरूकता वाढविण्याचे आवाहन केले. यावेळी डॉ. धुर्वे, डॉ. एस. एस. बावस्कर यांनी मार्गदर्शन केले. प्रमुख अतिथींनी त्यांच्या मार्गदर्शनात जागतिक व्याघ्र दिनाच्या महत्वावर प्रकाश टाकला. या कार्यक्रमाला कमला नेहरू कॉलेजच्या पर्यावरण विज्ञान विभागाच्या प्रमुख सौ. नेहा ठाकूर आणि इतर शिक्षक, संशोधक विद्यार्थी उपस्थित होते. आंतरराष्ट्रीय व्याघ्र दिवसाच्या निमित्ताने दोन प्रमुख उपक्रम आयोजित करण्यात आले. MCQ क्विझ स्पर्धा आणि पोस्टर बनवण्याची स्पर्धा आयोजित करण्यात आली. या उपक्रमांचा उद्देश वाघांच्या संरक्षणाबद्दल माहिती देणे आणि सर्जनशीलता व टीम वर्कला प्रोत्साहन देणे होता. एम.एस्सीच्या विद्यार्थ्यांनी या स्पर्धांमध्ये उत्साही सहभाग नोंदवला. पोस्टर बनवण्यात प्रथम स्थान सब्रीन बानो मन्सूरी, दुसरे स्थान प्रेरणा लांजेवार, वैभव अष्टनकर आणि प्राची लेंडे यांनी तर तृतीय स्थान पूजा कानोजिया, सोनल पाडोले आणि पायल मलामे यांनी मिळविले.

MCQ क्विझ स्पर्धेत प्रणव गायकवाड यांनी प्रथम, पूजा हरिणखेडे यांनी दुसरे तर तिसरे स्थान अनिरुद्ध चव्हाण यांनी प्राप्त केले. कार्यक्रमाची जबाबदारी प्राजक्ता तांडले (शिक्षण अधिकारी, जैवशास्त्रज्ञ, महाराजबाग प्राणी संग्रहालय) यांनी पार पाडली, तर आभार डॉ. अभिजीत मोठघरे (वैद्यकीय अधिकारी, महाराजबाग प्राणी संग्रहालय) यांनी मानले.







# भारतीय समाजाचे प्रेमचंद जागृत संरक्षक - डॉ. विजय शर्मा विद्यापीठ हिंदी विभागात प्रेमचंद जयंती उत्साहात

लेखक प्रेमचंद यांनी साहित्यातून मानवीय संवेदना अभिव्यक्त केल्या असून भारतीय समाजाचे ते जागृत संरक्षक होते, असे प्रतिपादन शिवायु आयुर्वेद लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक तथा साहित्यिक डॉ. विजय शर्मा यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या हिंदी विभागात साहित्यिक मुन्शी प्रेमचंद यांचा जयंती कार्यक्रम बुधवार, दिनांक ३१ जुलै २०२४ रोजी पार पडला. या वेळी आयोजित कार्यक्रमात डॉ. शर्मा मार्गदर्शन करीत होते.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी हिंदी विभाग प्रमुख डॉ. मनोज पांडे होते तर प्रमुख अतिथी म्हणून शिवायू आयुर्वेद लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. विजय शर्मा, वरिष्ठ पत्रकार आनंद निर्वाण यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. 'आमच्या काळात मुन्शी प्रेमचंद' या विषयावर पुढे बोलताना शर्मा यांनी मुंशी प्रेमचंद यांनी त्यांच्या साहित्यात केवळ सामाजिक साहित्याचे वर्णनच केले नाही तर त्याच्या समाधानाचा मार्ग देखील प्रशस्त केल्याचे सांगितले. समता आणि स्वातंत्र्याचा पुरस्कार करणारा समाज निर्मितीचा पुरस्कार प्रेमचंद यांचे साहित्य करते. त्यांनी आपल्या लेखनातून भारतीय सामाजिक मूल्यांचा प्रसार केला असल्याचे डॉ. शर्मा म्हणाले.

प्रमुख अतिथी वरिष्ठ पत्रकार आनंद निर्वाण यांनी मार्गदर्शन करताना मुंशी प्रेमचंद यांच्या कादंबऱ्यांमध्ये मानवी जीवनाचे वास्तववादी चित्रण करण्यात आले असल्याचे सांगितले. लोकांच्या उत्स्फूर्त अनुभवांचे ते निर्माते होते. त्यांनी त्यांच्या काळातील समस्या लोकप्रिय भाषेत मांडल्या. काळ बदलला, वातावरण बदलले, पण त्यावेळच्या समस्या आणि विसंगती आजही आहेत, असे निर्वाण म्हणाले.

प्रास्ताविक करताना हिंदी विभाग प्रमुख डॉ. मनोज पांडे यांनी मुंशी प्रेमचंद यांचे साहित्य अजरामर असल्याचे सांगितले. त्यांचे सर्जनशील जग सामान्य लोकांच्या जीवनाशी जोडलेले होते. समाजातील उपेक्षित आणि पिडीत घटकांचा ते आवाज होते. त्याच्या चिंतेची व्याप्ती व्यापक आणि व्यापक होती, असे डॉ. पांडे म्हणाले. आभार व्यक्त करताना सहयोगी प्राध्यापक डॉ. संतोष गिन्हे यांनी प्रेमचंद यांनी आपल्या कथांमध्ये जीवनमूल्ये प्रस्थापित केली असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे संचालन प्रा. जागृती सिंह यांनी केले. कार्यक्रमाला शहरातील प्रतिष्ठित साहित्यकार अविनाश बागडे, डॉ. संतोष 'बादल', इन्दिरा किसलय, हेमलता मिश्र मानवी, डॉ. सुमेध नागदेवे, डॉ. श्यामप्रकाश पांडे, प्रा. रवी शुक्ला, रमेश दकाते, डॉ. लखेश्वर चंद्रवंशी, डॉ. सुमित सिंह, डॉ. एकादशी जैतवार, प्रा. दामोदर द्विवेदी, आकांक्षा बांगर, विनय उपाध्याय यांच्यासह विद्यार्थी आणि संशोधक

**नवराष्ट्र**

# समाजाला नाईक यांच्या दूरदृष्टीची गरज

## माजी कुलगुरू निंबाळकर यांचे प्रतिपादन



नागपूर. आज जरी आपण अन्नधान्याने परिपूर्ण असलो तरी आगामी काळात अन्नधान्याची कमतरता भासणार आहे. त्यामुळे समाजाला वसंतराव नाईक यांच्या दूरदृष्टीची गरज असल्याचे प्रतिपादन डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. शरद निंबाळकर यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या वतीने जमनालाल बजाज प्रशासकीय भवनातील सभागृहात महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांची जयंती कृषी दिन म्हणून सोमवार, दिनांक 1 जुलै रोजी साजरी करण्यात आली. या कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून डॉ. निंबाळकर मार्गदर्शन करीत होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांनी भूषविले. प्रमुख वक्ते म्हणून डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला येथील माजी कुलगुरू डॉ. शरद निंबाळकर, कुलसचिव डॉ. राजू हिवसे, अधिसभा सदस्य डॉ. विजय इलोरकर, वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. नितीन डोंगरवार यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना वनस्पती शास्त्र विभाग प्रमुख डॉ. नितीन डोंगरवार यांनी कृषी दिन कार्यक्रम साजरा करण्यामागील पार्श्वभूमी सांगितली. अधिसभा सदस्य डॉ. विजय इलोरकर यांनी मनोगत व्यक्त करताना कृषी दिन विद्यापीठात साजरा व्हावा याबाबत प्रस्ताव पारित करून घेतल्याचे सांगितले. या कार्यक्रमाच्या माध्यमातून 75 टक्के नागरिकांचा व्यवसाय असलेल्या शेतीबाबत त्यातील आधुनिक तंत्रज्ञानाबाबत जागृती होईल, असा आशावाद व्यक्त केला. कार्यक्रमाचे संचालन मराठी विभागातील डॉ. अमृता इंदूरकर यांनी केले तर आभार कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांनी मानले. याप्रसंगी अधिष्ठाता, विभाग प्रमुख, संचालक, अधिकारी, कर्मचारी तसेच विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

**तरुण भारत**

Apla Nagpur | 2024-07-02 | Page- 5
epaper.tarunbharat.net

# विद्यापीठात सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना निरोप

◆ नागपूर, १ जुलै

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठातून सेवानिवृत्त झालेल्या शिक्षक, अधिकारी व कर्मचाऱ्यांचा निरोप समारंभ जमनालाल बजाज प्रशासकीय भवनातील सभागृहात पार पडला.विद्यापीठाच्या नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. राजेश सिंह यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमाला कुलसचिव डॉ. राजू हिवसे, उपकुलसचिव (महाविद्यालय) डॉ. स्मण मदने यांची उपस्थिती होती.

सेवानिवृत्त झालेले गृहविज्ञान विभागप्रमुख डॉ. कल्पना जाधव, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळ विभागातील सतीश पुसदकर, आस्थापना विभागातील रामदास जवंजाळ, विद्यापीठ छंद मंदिरातील प्रमोद देशमुख, अर्थशास्त्र विभागातील गणेश भलावी, मुद्रण व प्रकाशन विभागातील गोविंद जिभकाटे, ज्ञानस्त्रोत केंद्रातील शिवराम घाटोळे, स्थावर विभागातील अनिलकुमार मून, पदव्युत्तर मानवशास्त्र विभागातील शंकर मेंडके, रसायनशास्त्र विभागातील रमेश मसराम, विद्यार्थी वसतिगृहातील अनिल खोटपाल व ॲकॅडमिक स्टाफ कॉलेजमधील नाना लोखंडे यांचा सत्कार करण्यात आला.

सेवानिवृत्तीनिमित होत असलेला निरोप समारंभ हा भावनिक क्षण असल्याचे प्रतिपादन विद्यापीठ नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. राजेश सिंह यांनी केले. यावेळी प्रमोद देशमुख यांनी मनोगतात जुन्या आठवणींना उजाळा दिला. संचालन दीपक घोडमारे, आभारप्रदर्शन कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांनी केले. ◂(तभा वृत्तसेवा)

**देशोन्नती**

# समाजाला वसंतराव नाईक यांच्या दूरदृष्टीची गरज

देशोन्नती वृत्तसंकलन



नागपूर : आज जरी आपण अन्नधान्याने परिपूर्ण असलो तरी आगामी काळात अन्नधान्याची कमतरता भासणार आहे. त्यामुळे समाजाला वसंतराव नाईक यांच्या दूरदृष्टीची गरज असल्याचे प्रतिपादन डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. शरद निंबाळकर यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या वतीने जमनालाल बजाज प्रशासकीय भवनातील सभागृहात महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांची जयंती कृषी दिन म्हणून सोमवार, १ जुलै २०२४ रोजी साजरी करण्यात आली. या कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून डॉ. निंबाळकर मार्गदर्शन करीत होते.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान विद्यापीठाचे माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांनी भूषविले. प्रमुख वक्ते म्हणून डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला येथील माजी कुलगुरू डॉ. शरद निंबाळकर, कुलसचिव डॉ. राजू हिवसे, अधिसभा सदस्य डॉ. विजय इलो...

### तंत्रज्ञानाबाबत जागृती होणार

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख डॉ. नितीन डोंगरवार यांनी केले. या कार्यक्रमाच्या माध्यमातून ७५ टक्के नागरिकांचा व्यवसाय असलेल्या शेतीबाबत त्यातील आधुनिक तंत्रज्ञानाबाबत जागृती होईल, असा आशावाद व्यक्त केला. कार्यक्रमाचे संचालन मराठी विभागातील डॉ. अमृता इंदूरकर यांनी केले तर आभार कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांनी मानले. कार्यक्रमाला अधिष्ठाता, विभागप्रमुख, संचालक, अधिकारी, कर्मचारी तसेच विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

### माजी कुलगुरू डॉ. शरद निंबाळकर यांचे प्रतिपादन

वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. नितीन डोंगरवार यांची उपस्थिती होती. वीज कोठून येते, पिण्यास पाणी कोठून येते, हरितक्रांती म्हणजे काय? याची नवीन पिढीला माहिती व्हावी म्हणून माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या कार्याचे ...

Nagpur Edition
Jul 3, 2024 Page No. 2
Powered by: erelego.com

# प्रभार पुन्हा डॉ. बोकारेंकडे

## डॉ. सुभाष चौधरी यांच्या निलंबनानंतर राज्यपाल कार्यालयाकडून आदेश

म. टा. प्रतिनिधी, नागपूर

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या प्रभारी कुलगुरूपदाचा भार पुन्हा एकदा गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरू म्हणून डॉ. प्रशांत बोकारे यांच्या खांद्यावर टाकण्यात आला आहे. डॉ. सुभाष चौधरी यांना राज्यपालांनी पुन्हा एकदा निलंबित केल्यामुळे डॉ. बोकारे यांच्याकडे दुसऱ्यांदा ही जबाबदारी आली आहे. त्यांनी शुक्रवारी आपला पदभार स्वीकारला.

■ कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांच्याविरुद्ध असलेल्या तक्रारी लक्षात घेऊन राज्य सरकारने अजित बावीस्कर समिती नेमली होती. या समितीने चौकशीअंती विविध गैरव्यवहारप्रकरणी डॉ. चौधरी यांच्यावर ताशेरे ओढले होते.



त्यानुसार, डॉ. चौधरी यांना पहिल्यांदा निलंबित करण्यात आले होते. मात्र, निलंबन करताना योग्य कायदेशीर प्रक्रियेचे पालन न झाल्याचा ठपका ठेवत न्यायालयाने डॉ. चौधरी यांच्या निलंबनाचा आदेश रद्द केला होता.

■ त्यामुळे डॉ. चौधरी यांनी यांनी ११ एप्रिलला पुन्हा कुलगुरूपदाचा कार्यभार स्वीकारला. दरम्यान, उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे उपसचिव अशोक मांडे यांच्या समितीमार्फत राज्य शासनाने पुन्हा चौकशी केली.

■ ही चौकशी पूर्ण झाल्यानंतर राज्यपालांनी डॉ. चौधरी यांना स्पष्टीकरण देण्यासाठी कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत नोटीस काढली. दरम्यान, डॉ. चौधरी यांनी पुन्हा एकदा चौकशी प्रक्रियेला आव्हान देणारी याचिका उच्च न्यायालयात दाखल केली.

■ यावेळी न्यायालयाने डॉ. चौधरी यांच्या चौकशीवर अंतरिम स्थगिती देण्यास नकार दिला. परिणामतः डॉ. चौधरी यांना २६ जूनला चौकशीसाठी राज्यपाल कार्यालयात बोलाविण्यात आले. डॉ. चौधरी यांनी प्रत्यक्ष उपस्थित न राहता लेखी उत्तर सादर केले.

■ त्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे राज्यपालांनी डॉ. चौधरी यांना राजीनामा देण्यास सांगितले. डॉ. चौधरी यांनी दोन दिवसांची वैद्यकीय रजा मागून घेतली. तसेच राजीनामा देण्यास नकार दिल्यामुळे गुरुवारी राज्यपालांनी त्यांना दुसऱ्यांदा निलंबित केले.

■ या निलंबनानंतर, डॉ. प्रशांत बोकारे यांना राज्यपाल कार्यालयाकडून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू म्हणून पदाची सूत्रे सांभाळण्याचे आदेश प्राप्त झाले. त्यानुसार, शुक्रवारी त्यांनी पदभार स्वीकारला.

■ यावेळी कुलसचिव डॉ. राजू हिवसे, परीक्षा व मूल्यमापन मंडळ संचालक डॉ. प्रफुल्ल साबळे, वित्त व लेखा अधिकारी हरीश पालीवाल, उपकुलसचिव संजय बाहेकर, प्रदीप बिनीवाले, गणेश कुमकुमवार यांच्यासह अन्य उपस्थित होते.

**लोकमत**

नागपूर विद्यापीठाचा उपक्रम

# दिघोरीत सुरु होणार कौशल्य विकास केंद्र, रोजगाराचे मार्गदर्शनही

लोकमत न्यूज नेटवर्क

नागपूर : शहरातील दिघोरी परिसरात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाकडून कौशल्य विकास केंद्र सुरू केले जात आहे. कौशल्य विकास केंद्रामार्फत मिळणाऱ्या प्रशिक्षणातून युवकांना रोजगार तसेच स्वयंरोजगाराचे द्वार खुले होणार आहे. आयसीआयसीआय फाऊंडेशन यांच्या मदतीने हे केंद्र उभारण्यात आले आहे.



दिघोरीत सुरु होणार कौशल्य विकास केंद्र

विद्यापीठाच्या शताब्दी महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांच्या संकल्पनेतून 'रिचिंग टू अनरिच्ड' या अभियान अंतर्गत कौशल्य विकास केंद्राची निर्मिती करण्यात आली आहे. या ठिकाणी संगणक लॅब पूर्ण झाली आहे तर सोलर पॅनल लॅब तयार होत आहे. विद्यापीठ आजीवन अध्ययन व विस्तार विभागाकडून या कौशल्य प्रशिक्षण केंद्रात संगणकाबाबत विविध प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू केले जात आहे. त्याचप्रमाणे सोलर पॅनल निर्मिती ते ग्राहकांना वापराकरिता लावून देण्याबाबत संपूर्ण प्रशिक्षण अभ्यासक्रमाच्या माध्यमातून दिले जाणार आहे. विद्यापीठाचे रोजगार व प्रशिक्षण अधिकारी डॉ. भूषण महाजन यांच्या देखरेखीखाली कौशल्य विकास केंद्र पूर्णत्वास येत आहे. या कौशल्य विकास केंद्राचे उद्घाटन शुक्रवारी (दि.५) रोजी दुपारी १ वाजता मान्यवरांच्या उपस्थित होईल.

सीएसआर निधीतून लॅब निर्मित

विद्यार्थ्यांना रोजगार व स्वयंरोजगाराचे प्रशिक्षण मिळावे म्हणून आयसीआयसीआय फाऊंडेशनच्या सीएसआर नागपूर सेंटरच्या प्रमुख रिचा सिंह यांनी कौशल्य विकास केंद्र निर्मितीत सहकार्य दिले आहे. फाऊंडेशनच्या सीएसआर फंडातून कौशल्य विकास केंद्राकरिता फर्निचरसह ४० संगणक त्याचप्रमाणे संपूर्ण सोलर लॅब विद्यापीठाला प्राप्त होणार आहे.

### प्रशिक्षणासाठी ४ क्लासरुम

दिघोरी येथील कौशल्य विकास केंद्रात संगणक प्रशिक्षण लॅब तयार झाली असून सोलर पॅनल लॅबचे काम अंतिम टप्प्यात आहे. दोन लॅब तसेच एकूण ४ क्लासरुम तयार करण्यात आल्या आहेत. या ४ क्लासरुमच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना प्रशिक्षित केले जाणार आहे.

### मुलाखत कौशल्य विकसित करणार

या कौशल्य विकास केंद्रातून विद्यार्थ्यांना मुलाखत कौशल्य वृद्धिंगत करण्याची संधी मिळणार आहे. नांदी फाउंडेशनच्या माध्यमातून मुलाखत कौशल्य वृद्धिंगत करणारे सॉफ्ट स्कील अभ्यासक्रमदेखील या ठिकाणी सुरु केले जाणार आहेत.

**पुण्य नगरी**

# आगामी काळात अन्नधान्याची कमतरता भासणार : डॉ. निंबाळकर

पुण्य नगरी / प्रतिनिधी

नागपूर : आज जरी आपण अन्नधान्याने परिपूर्ण असलो तरी आगामी काळात अन्नधान्याची कमतरता भासणार आहे. त्यामुळे समाजाला वसंतराव नाईक यांच्या दूरदृष्टीची गरज असल्याचे प्रतिपादन डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. शरद निंबाळकर यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या वतीने जमनालाल बजाज प्रशासकीय भवनातील सभागृहात महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांची जयंती कृषिदिन म्हणून सोमवारी साजरी करण्यात आली. याप्रसंगी डॉ. निंबाळकर मार्गदर्शन करीत होते.

### विद्यापीठात वसंतराव नाईक यांची जयंती उत्साहात

### समाजाला वसंतराव नाईक यांच्या दूरदृष्टीची गरज



निंबाळकर, तसेच डॉ. राजू हिवसे, डॉ. विजय इलोरकर, डॉ. नितीन डोंगरवार उपस्थित होते.

डॉ. निंबाळकर म्हणाले, एक कुशल प्रशासक व भारतातील कृषिक्रांतीला ... प्रणेते होते. ग्रामीण भागात वीज, पाण्याची सुविधा मिळावी म्हणून पंचायत राज या त्रिस्तरीय रचनेचे प्रणेते वसंतराव नाईक होते. त्यांनी ग्रामीण पाणीपुरवठा योजना सुरू केली. समाजाच्या खालच्या स्तरातून ... महाराज नागपूर विद्यापीठाचे विद्यार्थी होते. 'एक एक पायरी चढत जावे, तुटक्या पायरीजवळ निराश होऊ नये, यशो मंदिर गाठावे आणि पहिल्या पायरीला विसरू नये', असे वसंतराव नाईक यांचे व्यक्तिमत्त्व होते.

समाजकारण करताना त्यांनी विरोधकांनादेखील आपलेसे केले. ... महाराष्ट्रात हरितक्रांतीची प्रतिज्ञा घेतली. अन्नधान्य वाढले नाही तर शनिवार वाड्यासमोर फाशी घेईल, अशी घोषणा करणारे ते व्यक्तिमत्त्व होते. त्यांनी ४ कृषी विद्यापीठांची स्थापना केली असून त्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात कृषी सुधारणा होत आहेत. प्रास्ताविक डॉ. डोंगरवार यांनी तर संचालन डॉ. अमृता ...

### मनुष्यबळाचा वापर देशसेवेसाठी : डॉ. चौधरी

आपणाकडे विद्यार्थ्यांच्या रूपाने मोठ्या प्रमाणात मनुष्यबळ आहे. या मनुष्यबळाचा वापर समाज अर्थात देशसेवेसाठी करता येईल, असे प्रकल्प शिक्षकांनी विद्यार्थ्यांना द्यावे, असे आवाहन डॉ. सुभाष चौधरी यांनी केले. स्थानिक समस्या शोधून त्यावर संशोधन करीत उपाययोजना कराव्या. या दृष्टीने नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार अभ्यासक्रम विद्यापीठाने तयार केले आहे. यातून विद्यार्थ्यांना स्थानिक स्तरावरील समस्यांबाबत संशोधन करता येईल. शासनाने गावपातळीवर मोठ्या प्रमाणात अधिकार दिले आहेत. त्याच्या अंमलबजावणीचे अधिकारदेखील गावाला दिले आहे. त्यामुळे विद्यापीठाने मार्गदर्शकाची भूमिका पार पाडावी, असे कुलगुरू म्हणाले.

**नवराष्ट्र**

उपक्रम विद्यार्थ्यांना प्रशिक्षण व रोजगारासाठी मदत मिळेल : आयसीआयसीआय फाउंडेशनच्या मदतीने केंद्र

# दिघोरी येथे विद्यापीठाचे कौशल्य विकास केंद्र

नागपूर. नागपूर विद्यापीठातर्फे दिघोरी परिसरात कौशल्य विकास केंद्र सुरू करण्यात येत आहे. यामध्ये युवकांना प्रशिक्षण दिले जाणार आहे. ज्यामुळे रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या संधी खुल्या होतील. आयसीआयसीआय फाउंडेशनच्या मदतीने हे केंद्र स्थापन केले जात आहे. दिघोरी येथील विधी महाविद्यालयाच्या इमारतीत हे केंद्र सुरू होत आहे. कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांच्या सूचनेनुसार केंद्राचे काम अंतिम टप्प्यात आहे. विद्यापीठाच्या शताब्दी वर्षानिमित्त 'रिचिंग टू अनरिच्ड' मोहिमेअंतर्गत हे केंद्र उभारण्यात येत आहे. संगणक लॅबचे काम पूर्ण झाले असून सोलर पॅनल लॅबचे काम सुरू आहे. विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागातर्फे या केंद्रात संगणकाचे विविध प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू केले जाणार आहेत. याशिवाय सोलर पॅनल निर्मितीपासून ते ग्राहकांना वापरण्यापर्यंतचे संपूर्ण प्रशिक्षण कोर्सद्वारे दिले जाईल. हे केंद्र रोजगार व प्रशिक्षण अधिकारी डॉ.भूषण महाजन यांच्या देखरेखीखाली पूर्ण होत आहे. या केंद्राचे लवकरच उद्घाटन होणार आहे.



आयसीआयसीआर फाउंडेशनच्या सीएसआर केंद्राच्या प्रमुख ऋचा सिंग यांनी केंद्राच्या उभारणीत महत्त्वपूर्ण सहकार्य केले आहे. फाउंडेशनने फर्निचर, 40 संगणक आणि एक सोलर लॅब बसवली आहे. यामध्ये 2 प्रयोगशाळा आणि एकूण 4 वर्गखोल्या तयार करण्यात आल्या आहेत. या 4 वर्गांतून विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले जाणार आहे. संगणक आणि सोलर पॅनल लॅब व्यतिरिक्त, केंद्र विद्यार्थ्यांना त्यांच्या मुलाखतीतील कौशल्ये सुधारण्याची संधी प्रदान करेल. नांदी फाउंडेशनच्या माध्यमातून मुलाखतीचे कौशल्य सुधारण्यासाठी सॉफ्ट स्किल कोर्सेसही येथे सुरू करण्यात येणार आहेत.

Orange City Plus Edition Edition
Jul 04, 2024 Page No. 3

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात कृषी दिन सोमवारी

नागपूर : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांची जयंती कृषी दिन म्हणून साजरी केली जाणार आहे. जमनालाल बजाज प्रशासकीय भवनातील सभागृहात सोमवार, १ जुलै २०२४ रोजी ११:३० वाजता हा कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमाला डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. शरद निंबाळकर उपस्थित राहणार आहे. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी भूषविणार असून, याप्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे उपस्थित राहणार आहे. कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन कुलसचिव डॉ. राजू हिवसे व वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख डॉ. एन. एम. डोंगरवार यांनी केले आहे.

DATE 27/6/2024 PAGE No. : 10

# ललित कला विभागातील पाच विद्यार्थ्यांच्या चित्रांचे जहांगीर आर्ट गॅलरीत प्रदर्शन

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाला बहुमान

लोकशाही वार्ता/नागपूर

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या ललित कला व छंद मंदिर विभागातील पाच विद्यार्थ्यांच्या चित्रांची मुंबई येथील जहांगीर आर्ट गॅलरीत प्रदर्शनीसाठी निवड झाली आहे. मागील तीन वर्षांपासून विभागातील विद्यार्थ्यांची निवड होत असल्याने राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाला बहुमान प्राप्त झाला आहे.

मुंबई येथील प्रतिष्ठीत जहांगीर आर्ट गॅलरी वार्षिक मान्सून चित्रप्रदर्शन आयोजित केली जाते. अत्यंत प्रतिष्ठेच्या असलेल्या जहांगीर आर्ट गॅलरीच्या मान्सून चित्र प्रदर्शनीसाठी ललितकला व छंद मंदिर विभागाच्या विद्यार्थ्यांची निवड होणे हा विद्यापीठासाठी एक आनंदाचा क्षण आहे. कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी, प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांच्या मार्गदर्शनाखाली विभाग प्रमुख डॉ. संयुक्ता थोरात यांच्या नेतृत्वात ललित कला व छंद विभागातील विद्यार्थी कला क्षेत्रातील नामवंत अशा संस्थांच्या कला पटलावर झळकत आहे. गिरीश फुलझेले, पूनम वड्डी, नेहा अवचित, सारिका चौधरी व नीता देव अशी निवड झालेल्या यशस्वी विद्यार्थ्यांची नावे आहेत. या विद्यार्थ्यांना डॉ. स्नेहल लिमये, डॉ. सदानंद चौधरी तसेच नाना मिसाळ यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले आहे. संपूर्ण भारतातून येणाऱ्या हजारो प्रवेशिकांमधून जहांगीर आर्ट गॅलरीच्या मान्सून चित्र प्रदर्शनीसाठी निवड केली जाते. या कठीण निवड प्रक्रियेतून निवडलेली पाचही विद्यार्थ्यांची चमू ही विद्यापीठासाठी अभिमानाची बाब आहे. विभागातील विद्यार्थी व शिक्षकांना वेळोवेळी योग्य दिशादर्शन करणाऱ्या विभाग प्रमुख डॉ. संयुक्ता थोरात यांनी स्वतः जहांगीर आर्ट गॅलरीतील प्रदर्शनीला भेट देत विद्यार्थ्यांचे कौतुक व अभिनंदन केले.

## डॉ. विशाखा जोशी विद्यापीठाच्या प्रभारी क्रीडा संचालक



नागपूर : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या प्रभारी क्रीडा संचालक म्हणून डॉ. विशाखा अरविंद जोशी यांनी शुक्रवारी (५ जुलै) पदभार स्वीकारला. डॉ. शरद सूर्यवंशी यांचा पाच वर्षांचा नियमित कार्यकाळ शुक्रवारी संपला. त्यामुळे विद्यापीठाचे क्रीडा संचालकपद रिक्त झाले होते. राष्ट्रीय खो-खो आणि आट्यापाट्याच्या खेळाडू आणि आर. एस. मुंडले धरमपेठ महाविद्यालयात क्रीडा विभागात कार्यरत डॉ. विशाखा जोशी यांची तातुम नागपूर विद्यापीठाच्या प्रभारी क्रीडा संचालकपदी नियुक्ती करण्यात आली. डॉ. विशाखा जोशी यांनी विद्यापीठाचे प्रभारी क्रीडा संचालकपद स्वीकारण्याप्रसंगी पदव्युत्तर शारीरिक शिक्षण विभागाच्या समन्वयक डॉ. माधवी मार्डीकर, जोतिबा शारीरिक शिक्षण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय दातारकर, डॉ. धनंजय वेळूकर उपस्थित होते.

Nagpur Edition Edition
Jul 06, 2024 Page No. 04
Powered by: erelego.com

## नवराष्ट्र

## जोशींनी स्वीकारला क्रीडा संचालकाचा पदभार

नागपूर. प्राध्यापक डॉ. विशाखा जोशी यांनी शुक्रवारी नागपूर विद्यापीठाच्या क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागाच्या कार्यवाहक संचालकाच्या रुपात कार्यभार स्वीकारला. शुक्रवारी डॉ. शरद सूर्यवंशी यांचा कार्यकाळ संपला.

डॉ. जोशी विद्यापीठाच्या दुसऱ्या महिला क्रीडा संचालक आहे. यापूर्वी डॉ. कल्पना जाधव यांनी हे पद सांभाळले होते. माजी राष्ट्रीय खो-खो आणि आट्यापाट्या खेळाडू डॉ. जोशी मागील 25 वर्षांपासून आरएस मुंडले धरमपेठ महाविद्यालयात प्राध्यापिका आहेत. त्यांचा नवमहाराष्ट्र क्रीडा मंडळाच्या वरिष्ठ पदाधिकाऱ्यांमध्ये समावेश आहे.



Orange City Plus Edition Edition
Jul 06, 2024 Page No. 5
Powered by: erelego.com

नागपुर . मंगलवार, 2 जुलाई 2024 16

## वसंतराव नाईक के दृष्टिकोण की आवश्यकता : डॉ. निंबालकर



### नागपुर विश्वविद्यालय में कृषि दिवस

भास्कर संवाददाता | नागपुर.

राष्ट्रसंत तुकड़ोजी महाराज नागपुर विश्वविद्यालय के जमनालाल बजाज प्रशासनिक भवन सभागृह में सोमवार को महाराष्ट्र के पूर्व मुख्यमंत्री वसंतराव नाईक की जयंती कृषि दिवस के रूप में मनाई गई। इस कार्यक्रम में मुख्य वक्ता के रूप में डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विश्वविद्यालय के पूर्व कुलगुरु डॉ. शरद निंबालकर ने कहा कि, आज भले ही हम अन्न से परिपूर्ण हैं, परंतु भविष्य में अन्न की कमी होगी। इसलिए समाज को वसंतराव नाईक की दृष्टि की आवश्यकता है। कार्यक्रम की अध्यक्षता कुलगुरु डॉ. सुभाष चौधरी ने की। मुख्य अतिथि के रूप में कुलसचिव डॉ. राजू हिवसे, अधिसभा सदस्य डॉ. विजय इलोरकर, वनस्पति विज्ञान विभाग प्रमुख डॉ. नितिन डोंगरवार उपस्थित थे। डॉ. सुभाष भाषण में कहा कि, हमारे पास छात्रों के रूप में बड़ी मात्रा में जनशक्ति है। उन्होंने शिक्षकों से छात्रों को प्रोजेक्ट देने का आग्रह किया ताकि इस जनशक्ति का उपयोग समाज यानी देश की सेवा में किया जा सके। स्थानीय समस्याओं को खोजकर उन पर शोध कर समाधान की योजना बनानी चाहिए। इस संबंध में विश्वविद्यालय ने नई राष्ट्रीय शिक्षा नीति के अनुसार पाठ्यक्रम तैयार किया है। इससे छात्र स्थानीय स्तर के मुद्दों पर शोध कर सकेंगे। सरकार ने ग्रामीण स्तर पर काफी अधिकार दिये हैं। इसकी प्रवर्तन शक्तियाँ भी गांव को दी गई हैं। इसलिए डॉ. चौधरी ने कहा कि विश्वविद्यालय को मार्गदर्शक की भूमिका निभानी चाहिए। कार्यक्रम की प्रस्तावना डॉ. नितिन डोंगरवार ने की। संचालन मराठी विभाग प्रमुख डॉ. अमृता इंदूरकर और आभार प्रदर्शन कुलसचिव डॉ. राजू हिवसे ने किया। कार्यक्रम में अधिष्ठाता, विभाग प्रमुख, निदेशक, अधिकारी, कर्मचारी एवं विद्यार्थी बड़ी संख्या में उपस्थित थे।

ly 2024
aper.bhaskarhindi.com/c/753

## TheHitavada

Nagpur City Line | 2024-07-06 | Page- 4
ehitavada.com

## Joshi is RTMNU Sports Deptt's officiating director

■ Sports Reporter

DR VISHAKHA Joshi has taken the charge as an officiating Director of Department of Sports and Physical Education of Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University (RTMNU) duirng a ceremony held on Friday.



Dr Joshi has taken charge from Dr Sharad Suryawanwhi whose term ended on Friday.

She will be the second woman director after Dr Kalpana Jadhav.

Dr Joshi is the professor at RS Mundle Dharampeth College for last 25 years. She is also former national kho-kho and atyapatya player and is also one of the senior officials of Nav Maharashtra Krida Mandal.

## नवभारत



## दिघोरी में विवि का कौशल विकास केंद्र, छात्रों को प्रशिक्षण

### रोजगार में मिलेगी मदद

■ नागपुर, नगर संवाददाता. दिघोरी क्षेत्र में नागपुर विश्वविद्यालय द्वारा कौशल विकास केंद्र शुरू किया जा रहा है. इसमें युवाओं को प्रशिक्षण दिया जाएगा. जिससे रोजगार और स्वरोजगार के अवसर खुलेंगे. यह केंद्र आईसीआईसीआई फाउंडेशन की मदद से स्थापित किया जा रहा है.

दिघोरी में विधि महाविद्यालय की इमारत में केंद्र शुरू किया जा रहा है. उपकुलगुरु डॉ. सुभाष चौधरी के निर्देशानुसार केंद्र का कार्य अंतिम चरण में है. विवि के शताब्दी महोत्सव के उपलक्ष्य में 'रीचिंग टू अनरीच्ड' अभियान के तहत केंद्र बनाया जा रहा है. कंप्यूटर लैब पूरी हो चुकी है और सोलर पैनल लैब का काम चल रहा है. विवि के आजीवन अध्ययन और विस्तार विभाग द्वारा केंद्र में कंप्यूटर के विभिन्न प्रमाणपत्र पाठ्यक्रम शुरू किए जाएंगे. साथ ही सोलर पैनल निर्माण से लेकर ग्राहकों के इस्तेमाल के अलावा इसे लगाने तक का पूरा प्रशिक्षण पाठ्यक्रम के माध्यम से दिया जाएगा. रोजगार व प्रशिक्षण अधिकारी डॉ.भूषण महाजन की देखरेख में केंद्र पूरा हो रहा है. केंद्र का उद्घाटन जल्द ही किया जाएगा. आईसीआईसीआई फाउंडेशन के सीएसआर केंद्र की प्रमुख ऋचा सिंह ने केंद्र के निर्माण में महत्वपूर्ण सहयोग दिया है. फाउंडेशन ने फर्नीचर, 40 कंप्यूटर और सोलर लैब लगाई है. इसमें 2 लैब और कुल 4 कक्षाएं तैयार की गई हैं. इन 4 कक्षाओं के माध्यम से छात्रों को प्रशिक्षित किया जाएगा. कंप्यूटर और सोलर पैनल लैब के अलावा केंद्र से छात्रों को साक्षात्कार कौशल में सुधार करने का अवसर मिलेगा. नांदी फाउंडेशन के माध्यम से साक्षात्कार कौशल सुधारने वाले सॉफ्ट स्किल पाठ्यक्रम भी यहां शुरू किए जाएंगे.

Nagpur Edition Edition
Jul 04, 2024 Page No. 4
Powered by: erelego.com

## शताब्दीचा समारोप मेळाव्याने

### माजी विद्यार्थी येणार एकत्र; नागपूर विद्यापीठाचे ऑगस्टमध्ये आयोजन

म. टा. प्रतिनिधी, नागपूर

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या शताब्दी महोत्सवाचा समारोप माजी विद्यार्थ्यांचा सन्मान करुन केला जाणार आहे. यासाठी, ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यात माजी विद्यार्थ्यांच्या मेळाव्याचे आयोजन करण्यात येणार आहे. त्यादृष्टीने, विद्यापीठाने तयारी सुरू केली असून माजी विद्यार्थ्यांसह माजी शिक्षक आणि कर्मचाऱ्यांना या मेळाव्यात आमंत्रित केले जाणार आहे.



या माजी विद्यार्थी मेळाव्याच्या तयारीनिमित्त विद्यापीठाच्या जमनालाल बजाज प्रशासकीय भवनातील सभागृहात मंगळवारी बैठकीचे आयोजन करण्यात आले. प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे यांनी तयारीचा आढावा घेतला. प्रमुख अतिथी म्हणून माजी विद्यार्थी मेळावा समिती सचिव डॉ. कल्पना पांडे, प्रभारी विद्यार्थी विकास विभागप्रमुख डॉ. राजेश सिंह, शताब्दी महोत्सव कक्षाचे सहसमन्वयक डॉ. संतोष कसबेकर, डॉ. अनंत पांडे, प्रमोद तिजारे प्रामुख्याने उपस्थित होते.

यावेळी माजी विद्यार्थी मेळावा समिती सचिव डॉ. कल्पना पांडे यांनी मेळाव्याच्या आयोजनासंदर्भात माहिती दिली. शताब्दी पूर्ण झालेल्या विद्यापीठाचे माजी विद्यार्थी समाजाच्या विविध क्षेत्रात कार्यरत असून अनेक नामवंत विद्यार्थ्यांनी विद्यापीठाचा नावलौकिक वाढविला आहे. शताब्दी महोत्सवी वर्षात त्यांचा येथोचित सन्मान होणे गरजेचे असल्याने या मेळाव्याचे आयोजन असल्याचे त्यांनी सांगितले. मोठ्या संख्येने माजी विद्यार्थी या मेळाव्यामध्ये सहभागी होण्याची शक्यता असल्याने सर्व विभागांनी त्यादृष्टीने तयारी करावी, अशा सूचना त्यांनी दिल्या.

डॉ. संजय दुधे यांनी मेळाव्याच्या निमित्ताने माजी विद्यार्थी येणार असल्याने विभाग विकासाच्या दृष्टीने आराखडा तसेच संकल्पना तयार ठेवण्याचे आवाहन केले. शताब्दी महोत्सवाच्या समारोपीय कार्यक्रमाच्या निमित्ताने माजी विद्यार्थ्यांच्या सहभागातून विद्यापीठाचा विकास झाला पाहिजे यादृष्टीने नियोजन करण्याचे आवाहनही त्यांनी केले. तर, माजी विद्यार्थ्यांच्या नोंदणीबाबत विद्यापीठाच्या संकेतस्थळावर लिंक उपलब्ध करून देण्यात आल्याची माहिती डॉ. संतोष कसबेकर यांनी दिली. बैठकीला शताब्दी महोत्सव कक्षाचे विशेष कार्य अधिकारी प्रदीप बिनीवाले यांच्यासह सर्व शैक्षणिक विभागप्रमुख आणि संचालक उपस्थित होते.

## लोकसत्ता

## नवीन शैक्षणिक धोरणात रोजगाराच्या संधी

### डॉ. सतीश चाफले यांची माहिती

लोकसत्ता प्रतिनिधी

नागपूर : राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात रोजगाराच्या नवीन संधी असल्याचे प्रतिपादन शिक्षण मंचचे महामंत्री डॉ. सतीश चाफले यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ गृहअर्थशास्त्र अभ्यासमंडळ व आर. एस. मुंडले धरमपेठ कला व वाणिज्य महाविद्यालय, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने गृहअर्थशास्त्र विषयाची राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० या संदर्भात एक दिवसीय कार्यशाळा धरमपेठ



महाविद्यालयात पार पडली. यावेळी डॉ. चाफले मार्गदर्शन करीत होते.

कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहन नगराळे उपस्थित होते. पुढे मार्गदर्शन करताना डॉ. चाफले यांनी विद्यार्थ्यांना रोजगारक्षम बनवण्यासाठी नवीन शैक्षणिक धोरण किती उपयुक्त आहे, याबाबत त्यांनी माहिती दिली. भारतीय प्राचीन खाद्य संस्कृतीचे पौ[...] रोजगाराच्या न[...] लक्ष वेधले. [...] धोरणामुळे कु[...] वर्कलोड कम[...] वाढणार अस[...] कार्यक्रमाचे [...] गृहअर्थशास्त्र [...] अध्यक्षा डॉ. सं[...]

10/07/2024 | Nagpur | Page : 12
Source : https://epaper.loksatta.com

## नवभारत

## सम्मान देता है वकीली पेशा

### डॉ. आंबेडकर विधि महाविद्यालय में डिग्री वितरण समारोह



■ नागपुर, महानगर संवाददाता. वकीली समाज में आदर देने वाला पेशा होने का प्रतिपादन उच्च न्यायालय की न्यायमूर्ति वृषाली जोशी ने किया. वे नागपुर विवि के डॉ. बाबासाहब आंबेडकर विधि महाविद्यालय के डिग्री वितरण समारोह में बोल रही थी. महाराज बाग स्थित दीक्षांत सभागृह में आयोजित कार्यक्रम में महाराष्ट्र व गोवा बार एसोसिएशन के सदस्य एड. पारिजात पांडे, अधिष्ठाता डॉ. प्रशांत कडू, प्राचार्य डॉ. रविशंकर मोर प्रमुखता से उपस्थित थे. न्यायमूर्ति जोशी ने कहा कि विधि क्षेत्र में सफल होने के लिए शैक्षणिक उत्कृष्टता के साथ ही अनुभव भी आवश्यक है. किसी भी क्षेत्र में सफलता के लिए कठिन प्रयासों की जरूरत होती है. इसकी शुरुआत आज से ही करना होगा. एड.पारिजात पांडे ने कहा कि महाविद्यालय की गौरवशाली परंपरा रही है. उन्होंने विद्यार्थी जीवन के विविध घटकों को उजागर किया. डॉ. कडू ने कहा कि समाज की जरूरतों को ध्यान में रखते हुए विधि क्षेत्र की समस्याओं का निराकरण करने का आह्वान किया. बढ़ती जनसंख्या का उपयोग देश को महासत्ता बनाने के लिए होना चाहिए. प्रास्ताविक भाषण प्राचार्य डॉ.मोर ने दिया. न्यायमूर्ति जोशी के हाथों मेधावी छात्रा सोनल भार्गव व अक्षता ब्राम्हपुरीकर को उनकी मां के स्मृति निमित्त स्मृति चिन्ह व 10,000 रुपये नकद पुरस्कार दिया. अतिथियों के हाथों छात्रों का सत्कार व डिग्री वितरित की गई. संचालन हर्षिता पांडे व आभार उपप्राचार्य प्रवीणा खोब्रागड़े ने माना. कार्यक्रम में डॉ. अधरा देशपांडे, डॉ.चिन्मयी निमखेड़कर, प्रा. मृण्मयी कुकड़े, प्रा. अर्चना प्रांजले, प्रा. प्रवीणा उराडे, प्रा.ममता गोमासे आदि उपस्थित थे.

Nagpur Edition Edition
Jul 12, 2024 Page No. 5
Powered by: erelego.com

## बीबीए, बीसीएची कॉलेजे वाढणार

### एआयसीटीईने मागविले प्रस्ताव, १५ जुलैपर्यंत मुदत

कॅम्पस कनेक्ट

म.टा. प्रतिनिधी, नागपूर

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्यावतीने मोठ्या संख्येने बीबीए, बीसीए आणि बीएमएस अभ्यासक्रमांना मान्यता देण्यात येणार आहे. या अभ्यासक्रमांची देशभरातील वाढती मागणी लक्षात घेऊन परिषदेने हा निर्णय घेतला आहे.



परिषदेने आजपर्यंत सुमारे ५५०० बीबीए, बीसीए आणि बीएमएस अभ्यासक्रमांना परवानगी दिली आहे. त्यानंतरही, अनेक कॉलेजांकडून हे अभ्यासक्रम सुरू करण्याकरिता परिषदेकडे मागणी केली जाते आहे. देशभरातून येणारी ही मागणी लक्षात घेऊन अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने या अभ्यासक्रमांसाठी नव्याने अर्ज स्वीकारण्याची तयारी सुरू केली आहे. २०२४-२५ या सत्राकरिता अभ्यासक्रमांचे अर्ज करण्याकरिता परिषदेने आपले पोर्टल पुन्हा एकदा सुरू केले आहे. त्यामुळे, अद्याप ज्या संस्थांनी हे अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी अर्ज केले नाहीत त्यांना पुन्हा एक संधी मिळणार आहे. १५ जुलैपर्यंत पाच हजार रुपये विलंब शुल्क भरुन संस्थांना हे अर्ज करता येणार आहेत. या वाढलेल्या मुदतीचा लाभ घेऊन संस्थांनी आपले अर्ज सादर करावे, अशी सूचना अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने केली आहे. यासंदर्भातील अधिक माहितीकरिता संस्थांनी www.aicte-india.org या संकेतस्थळावर अर्ज करावा, असेही आवाहन परिषदेच्यावतीने करण्यात आले आहे.

**अनेक शिक्षण संस्थांचा पुढाकार**

इंजिनीअरिंगप्रमाणेच बीबीए, बीसीए आणि बीएमएससारख्या अभ्यासक्रमांकडेही विद्यार्थ्यांचा कल आणि त्यांचे प्रवेश वाढू लागले आहेत. त्यामुळे, हे अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी अनेक उच्च शिक्षण संस्था पुढे आल्या आहेत. त्याचाच परिणाम म्हणून अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेकडे येणाऱ्या अर्जांमध्ये वाढ झाली आहे.

## डॉ. जोशी ने खेल विभाग की कार्यवाहक निदेशक का पदभार संभाला



भास्कर खेल | नागपुर

डॉ. विशाखा जोशी ने शुक्रवार को नागपुर विश्वविद्यालय के खेल एवं शारीरिक शिक्षा विभाग की कार्यवाहक निदेशक का पदभार संभाला। उन्होंने डॉ. शरद सूर्यवंशी से पदभार ग्रहण किया, जिनका पांच वर्षीय कार्यकाल शुक्रवार को समाप्त हो गया। डॉ. जोशी पिछले 25 वर्षों से आरएस मुंडले धरमपेठ कॉलेज में प्रोफेसर हैं। वे पूर्व राष्ट्रीय खो-खो और आट्या-पाट्या खिलाड़ी भी हैं। डॉ. कल्पना जाधव के बाद डॉ. जोशी दूसरी नागपुर विवि की महिला खेल निदेशक बनीं।

दैनिक भास्कर
Sat, 06 July 2024
https://epaper.bhaskarhindi.com/c/753

## सकाळ

## विद्यापीठाच्या क्रीडा विभागात आता महिलाराज

### डॉ. विशाखा जोशी बनल्या शारीरिक शिक्षण विभागाच्या दुसऱ्या महिला संचालक

■ सकाळ वृत्तसेवा

नागपूर, ता. ८ : माजी राष्ट्रीय खो-खो खेळाडू व आर. एस. मुंडले धरमपेठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्य डॉ. विशाखा जोशी यांची राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागाच्या प्रभारी संचालकपदी नियुक्ती करण्यात आली आहे. माजी क्रीडा संचालक डॉ. कल्पना जाधव यांच्यानंतर संचालकपद सांभाळणाऱ्या त्या दुसऱ्या महिला ठरल्या आहेत.

शारीरिक शिक्षण कार्यालयात आयोजित एका छोटेखानी कार्यक्रमात डॉ. जोशी यांनी सेवानिवृत्त झालेले क्रीडा संचालक डॉ. शरद सूर्यवंशी यांच्याकडून पदाची सूत्रे स्वीकारली. याप्रसंगी शारीरिक शिक्षण व क्रीडा मंडळाचे सदस्य डॉ. धनंजय वेळूकर, जोतिबा शारीरिक शिक्षण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय दातारकर, विद्यापीठाच्या पदव्युत्तर शिक्षण विभागाच्या प्रमुख डॉ. माधवी मार्डीकर आदी उपस्थित होते. नवमहाराष्ट्र क्रीडा मंडळाच्या वरिष्ठ सदस्य असलेल्या डॉ. जोशी यांच्याकडे अल्प काळासाठी कार्यभार असल्याने त्यांच्याकडून खूप अपेक्षा करता येणार नाही. मात्र खेळाडू आणि क्रीडा संघटक म्हणून असलेला दीर्घ अनुभव लक्षात घेता, त्या पूर्णकालीन क्रीडा संचालक नियुक्त होईपर्यंत आपल्या भूमिकेला न्याय देतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

विद्यापीठाच्या क्रीडा इतिहासात एकाचवेळी दोन महत्त्वपूर्ण पदांवर महिलांची नियुक्ती होण्याची ही दुसरी वेळ आहे. यापूर्वी डॉ. कल्पना जाधव व डॉ. माधवी मार्डीकर यांनी अनुक्रमे शारीरिक शिक्षण विभाग व पदव्युत्तर विभागप्रमुख ही पदे भूषविलेली आहे.

उल्लेखनीय म्हणजे, डॉ. विशाखा जोशी यांना धरमपेठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्य आणि प्रभारी संचालक अशी दुहेरी भूमिका पार पाडावी लागणार आहे.

दरम्यान, पाच वर्षांचा यशस्वी कार्यकाळ संपवून सेवानिवृत्त झालेले माजी आंतरराष्ट्रीय धावपटू डॉ. शरद सूर्यवंशी यांनी संचालक म्हणून पाच वर्षांत चांगलीच छाप सोडली आहे. डॉ. सूर्यवंशी यांनी खेळाडूंसाठी अनेक कल्याणकारी योजना राबवून निर्णय घेतले. परिणामतः खेळाडूंच्या कामगिरीचा आलेख कमालीचा उंचावला. विद्यापीठाच्या अनेक खेळाडू व संघांनी राज्य व राष्ट्रीय स्तरावर पदके व विजेतेपद मिळवून दिली.



नागपूर : सेवानिवृत्त क्रीडा संचालक डॉ. शरद सूर्यवंशी यांच्याकडून पदाची सूत्रे स्वीकारताना डॉ. विशाखा जोशी. बाजूला डॉ. धनंजय वेळूकर व इतर.

**सिंथेटिक ट्रॅक सर्वात मोठी उपलब्धी**

कित्येक वर्षांपासून प्रतीक्षा असलेला सिंथेटिक ट्रॅक पूर्ण होणे, ही डॉ. सूर्यवंशी यांची सर्वात मोठी उपलब्धी होती. उल्लेखनीय म्हणजे, विद्यापीठाच्या स्थापनेच्या शंभराव्या वर्षात खेळाडूंना हक्काचा ट्रॅक मिळाला. याशिवाय खेळाडूंना आर्थिक मदत, भत्त्यात वाढ व शिष्यवृत्ती देण्याचे कामही त्यांनी प्रामाणिकपणे केले. भविष्यात सर्व सुविधांयुक्त मल्टीपरपज इनडोअर हॉल व अन्य सोयीसुविधा करण्यात येणार असून, हे काम आता नव्या संचालकांना करावे लागणार आहे.

Nagpur, Nagpur-Today
09/07/2024 Page No. 2

## सकाळ

## वकिली हा समाजात आदर देणारा पेशा : न्या. वृषाली जोशी

### विधी महाविद्यालयात पदवी वितरण सोहळा



नागपूर : डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालयाच्या वतीने दीक्षांत सभागृहात आयोजित पदवी वितरण सोहळ्यात गुणवंत विद्यार्थिनी सोनल भार्गव हिला स्मृतीचिन्ह देताना न्यायमूर्ती वृषाली जोशी. बाजूला ॲड. पारिजात पांडे, डॉ. प्रशांत कडू, प्राचार्य डॉ. रविशंकर मोर, डॉ. प्रवीणा खोब्रागडे, डॉ. अधरा देशपांडे.

■ सकाळ वृत्तसेवा

नागपूर, ता. ११ : वकिली हा समाजात आदर देणारा पेशा असल्याचे प्रतिपादन मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाच्या न्यायमूर्ती वृषाली जोशी यांनी केले.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालयाच्या वतीने दीक्षांत सभागृहात आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र व गोवा बार असोसिएशनचे सदस्य ॲड. पारिजात पांडे, विद्यापीठ आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. प्रशांत कडू, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रविशंकर मोर, उपप्राचार्य डॉ. प्रवीणा खोब्रागडे उपस्थित होते.

न्या. वृषाली जोशी म्हणाल्या, विधी क्षेत्रामध्ये यशस्वी होण्यासाठी शैक्षणिक उत्कृष्टता असण्यासोबतच अनुभवाची जोड आवश्यक आहे. पालकांचे पाठबळ आपणास बळ देत असून गोंधळून न जाता आयुष्यात पालकांकडून मार्गदर्शन घेण्याचे आवाहनच त्यांनी केले. सोबतच यशस्वी जीवनाचा मंत्रही विद्यार्थ्यांना दिला. ॲड. पारिजात पांडे यांनी, आता केवळ अभ्यासक्रम पूर्ण झाला असून खऱ्या शिक्षणास सुरुवात झाल्याचे आपल्या मार्गदर्शनात सांगितले. विधी महाविद्यालयाला फार मोठी परंपरा असल्याचे सांगून त्यांनी विद्यार्थी जीवनातील विविध घटनांना त्यांनी उजाळा दिला. विधी शाखेतून पदवी प्राप्त विद्यार्थ्यांना त्यांनी शुभेच्छा दिल्या. मार्गदर्शन करताना डॉ. प्रशांत कडू यांनी समाजातील गरजा लक्षात घेऊन विधी क्षेत्रातील समस्यांचे निराकरण करण्याचे आवाहन विद्यार्थ्यांना केले. जोशी यांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थिनी सोनल भार्गव आणि अक्षता ब्राह्मपुरीकर यांना त्यांच्या आईच्या स्मृतीप्रित्यर्थ स्मृतीचिन्ह आणि १० हजार रुपये रोख रक्कम बक्षीस म्हणून देण्यात आले. अतिथींच्या हस्ते महाविद्यालयातील गुणवंतांचा सत्कार करीत अन्य विद्यार्थ्यांना पदवी वितरण करण्यात आले. प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रविशंकर मोर यांनी केले. संचालन हर्षिता पांडे यांनी तर आभार उपप्राचार्य डॉ. प्रवीणा खोब्रागडे यांनी मानले. कार्यक्रमात डॉ. अधरा देशपांडे, प्रा. ममता गोमासे, डॉ. चिन्मयी निमखेडकर, प्रा. प्रवीणा उराडे, प्रा. अर्चना प्रांजळे, प्रा. मृण्मयी कुकडे यांच्यासह शिक्षक कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

Nagpur, Nagpur-Today
12/07/2024 Page No. 3



शुक्रवार को नागपुर विश्वविद्यालय के प्रभारी कुलगुरू के पद पद डॉ. प्रशांत बोकारे को राज्यपाल रमेश बैस ने नियुक्त करने पर उन्होंने पदभार ग्रहण किया.

Main Edition Edition
Jul 06, 2024 Page No. 3
Powered by: erelego.com



## डॉ. आंबेडकर लॉ कॉलेजमध्ये दीक्षांत समारंभ

नागपूर : 'वकिली हा समाजात आदर देणारा पेशा आहे. मात्र इतर कोणत्याही क्षेत्राप्रमाणे याही क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी कठीण प्रयत्नांची गरज असते. या प्रयत्नांना विद्यार्थ्यांनी लगेचच सुरुवात करावी, असे मत उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती वृषाली जोशी यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालयाचा दीक्षांत समारंभ महाराजबाग परिसरातील दीक्षांत सभागृहात शनिवारी पार पडला. या कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून न्या. जोशी यांनी मार्गदर्शन केले. यावेळी, महाराष्ट्र व गोवा बार असोसिएशनचे सदस्य ॲड. पारिजात पांडे, विद्यापीठ आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. प्रशांत कडू, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रविशंकर मोर उपस्थित होते. ॲड. पारिजात पांडे व डॉ. प्रशांत कडू यांनीदेखील मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. मोर यांनी केले. न्या. जोशी यांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थिनी सोनल भार्गव आणि अक्षता ब्राह्मपुरीकर यांना स्मृतिचिन्ह आणि दहा हजार रुपये रोख रक्कम बक्षीस म्हणून देण्यात आली. यावेळी महाविद्यालयातील गुणवंतांचा सत्कार करीत अन्य विद्यार्थ्यांना पदवी वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन हर्षिता पांडे यांनी केले. आभार उपप्राचार्य डॉ. प्रवीणा खोब्रागडे यांनी मानले. कार्यक्रमाला डॉ. अधरा देशपांडे, डॉ. चिन्मयी निमखेडकर, प्रा. मृण्मयी कुकडे, प्रा. अर्चना प्रांजळे, प्रा. प्रवीणा उराडे, प्रा. ममता गोमासे यांच्यासह शिक्षक कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## मास मीडिया में करियर बनाने के लिए एडमिशन प्रोसेस शुरू

सिटी भास्कर | नागपुर

आज छात्रों के पास डॉक्टर या इंजीनियर जैसे करियर ऑप्शन के अलावा अन्य प्रोफेशनल क्षेत्र हैं, जिसमें वे अपना बेहतरीन करियर



बना सकते हैं। इसमें बोल्ड प्रोफेशन के रूप में मास मीडिया भी बेहतर विकल्प है। इसकी पढ़ाई से छात्र मीडिया में प्रोफेशनल स्किल्स सीखकर अपना करियर और पहचान बना सकते हैं। इसके लिए राष्ट्रसंत तुकड़ोजी महाराज नागपुर विश्वविद्यालय के स्वायत्तता-प्राप्त जनसंचार (मास कम्युनिकेशन) विभाग द्वारा एडमिशन प्रोसेस शुरू कर दिया है।




### एनईपी 2020 पर आधारित होगा पाठ्यक्रम

पत्रकारों और मीडिया एक्सपर्ट द्वारा रचे गए पाठ्यक्रम युवाओं को नौकरी एवं स्वरोजगार के लिए कई ऑप्शन देते हैं। विभाग द्वारा दी गई जानकारी के अनुसार वर्तमान में एक वर्षीय बैचलर ऑफ जर्नलिज्म (बी.जे.), दो वर्षीय एम.ए. (जनसंचार) और वीडियो प्रोग्रामिंग में एक वर्षीय पी.जी. डिप्लोमा के लिए एडमिशन शुरू हैं। इसके लिए किसी भी विषय से ग्रेजुएट छात्र आवेदन कर सकते हैं। यह पाठ्यक्रम मीडिया उद्योग की जरूरतें और राष्ट्रीय शिक्षा नीति (एनईपी2020) पर आधारित हैं। इस संबंध में अधिक जानकारी के लिए इच्छुक छात्र जनसंचार विभाग, आरटीएमएनयू से संपर्क कर सकते हैं।

दैनिक भास्कर Sun, 14 July 2024 https://epaper.bhaskarhindi.com/c/75467968

सकाळ

## नामवंत माजी विद्यार्थ्यांचा विद्यापीठ करणार सन्मान

नागपूर, ता. ११ : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ नामवंत अशा माजी विद्यार्थ्यांचा सन्मान करणार आहे. शताब्दी महोत्सवी वर्ष समारोपीय कार्यक्रमाच्या निमित्याने माजी विद्यार्थी मेळाव्याचे आयोजन केले जाणार आहे. या माजी विद्यार्थी मेळाव्याची जय्यत तयारी सुरू आहे. याबाबत जमनालाल बजाज प्रशासकीय भवनातील सभागृहात मंगळवारी (ता.९) रोजी पार पडलेल्या प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे यांनी आढावा घेतला.

बैठकीत माजी विद्यार्थी मेळावा समिती सचिव डॉ. कल्पना पांडे, प्रभारी विद्यार्थी विकास विभाग प्रमुख डॉ. राजेश सिंह, शताब्दी महोत्सव कक्षाचे सहसमन्वयक डॉ. संतोष कसबेकर, डॉ. अनंत पांडे, प्रमोद तिजारे यांची प्रामुख्याने उपस्थित होते. विद्यापीठ शताब्दी महोत्सवी वर्षाचा समारोपीय कार्यक्रम ऑगस्ट महिन्याच्या पहिल्या आठवड्यात आयोजित आहे.

या कार्यक्रमात माजी शिक्षक, कर्मचारी तसेच माजी विद्यार्थी मेळावा होणार आहे. डॉ. कल्पना पांडे यांनी मेळावा आयोजनाबाबत माहिती दिली. १०० वर्षे पूर्ण झालेल्या विद्यापीठाचे माजी विद्यार्थी समाजाच्या विविध क्षेत्रांत कार्यरत असल्याचे त्यांनी सांगितले. अनेक नामवंत विद्यार्थ्यांनी विद्यापीठाचा नावलौकिक वाढविल्याचे सांगितले.

यावेळी शताब्दी महोत्सवी वर्षात त्यांचा यथोचित सन्मान होणे गरजेचे असल्याने या मेळाव्याचे आयोजन असल्याचे ते म्हणाले. त्यासाठी सर्व विभागांनी त्या दृष्टीने तयारी करावी अशा सूचना त्यांनी दिल्या. विभागाशी संबंधित माजी विद्यार्थी सहभागी होत असल्यास त्यांची संपूर्ण माहिती गोळा करण्याबाबत यावेळी सूचित करण्यात आले. शताब्दी बैठकीत नियोजन शताब्दी महोत्सव कक्षाचे विशेष कार्य अधिकारी प्रदीप बिनीवाले यांनी केले.



नागपूर : माजी विद्यार्थी मेळाव्याच्या आयोजनाच्या पूर्वतयारीचा बैठकीत प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे, डॉ. कल्पना पांडे, डॉ. राजेश सिंह, डॉ. संतोष कसबेकर, डॉ. अनंत पांडे, प्रमोद तिजारे.

Nagpur, Nagpur-Today

देशोन्नती

## शताब्दी महोत्सवाचा समारोप होणार अविस्मरणीय

देशोन्नती वृत्तसंकलन

नागपूर : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ शताब्दी महोत्सवी वर्षाचा समारोपीय कार्यक्रम अविस्मरणीय होणार आहे. ऑगस्ट महिन्याच्या पहिल्या आठवड्यात आयोजित कार्यक्रमात माजी शिक्षक, कर्मचारी तसेच माजी विद्यार्थी मेळावा होणार आहे. कार्यक्रमाच्या अनुषंगाने पूर्वतयारी बैठक जमनालाल बजाज प्रशासकीय भवनातील सभागृहात पार पडली. या बैठकीत कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांनी तयारीचा आढावा घेतला.

### माजी शिक्षक, अधिकारी-कर्मचाऱ्यांचा होणार मेळावा



बैठकीच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी होते. तर यावेळी विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. प्रशांत माहेश्वरी, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. संजय कवीश्वर, मानवविज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी, आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. प्रशांत कडू यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. यावेळी मार्गदर्शन करताना कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांनी वैद्यकीय, अभियांत्रिकी त्याचप्रमाणे औषधी निर्माणशास्त्र विभागातील माजी विद्यार्थी मेळाव्याला उपस्थित राहणार

### ३ ऑगस्टला माजी विद्यार्थ्यांचा मेळावा

२ ऑगस्ट रोजी माजी शिक्षक, कर्मचारी तर ३ ऑगस्ट रोजी माजी विद्यार्थी मेळावा आयोजित होणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले. सामाजिक तसेच विविध क्षेत्रात नामांकित असलेल्या माजी विद्यार्थ्यांच्या हस्ते विभागाच्या वतीने या कार्यक्रमात वृक्षारोपणदेखील करण्याचे नियोजन आहे. माजी विद्यार्थी, माजी शिक्षक, कर्मचारी यांची संभाव्य उपस्थिती आणि त्यांच्या नियोजनाबाबत बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली.

असल्याचे सांगितले. या सोबतच सर्व शैक्षणिक विभागांनी त्यांच्या विभागातील नामवंत असलेल्या माजी विद्यार्थ्यांची माहिती गोळा करण्याचे आवाहन केले.

पूर्वतयारी बैठकीला विविध शैक्षणिक विभागांचे विभागप्रमुख, संचालक व अधिकारी उपस्थित होते. सर्व उपस्थितांचे आभार अधिष्ठाता डॉ. संजय कवीश्वर यांनी मानले. बैठकीचे यशस्वी नियोजन शताब्दी महोत्सव कक्षाचे विशेष कार्य अधिकारी प्रदीप बिनीवाले यांनी केले.

Nagpur Edition Edition
Jul 08, 2024 Page No. 3
Powered by: erelego.com

लोकसत्ता

## सध्याच्या शिक्षणाचा पाया ढासळलेला

### राष्ट्रसंत व्याख्यानमालेत संकेत काळे यांची खंत

लोकसत्ता प्रतिनिधी

नागपूर : प्राथमिक शिक्षणापासूनच जीवन शिक्षणाची सुरुवात होणे गरजेचे असल्याचे राष्ट्रसंतांनी सांगितले आहे. मात्र, ते मिळत नसल्याने शिक्षणाचा पायाच ढासळला आहे. विद्यार्थी कष्ट करू शकत नाही. स्वयंरोजगार करता येत नाही. मुलगा काय शिकतो हे आईला कळत नाही, अशी शिक्षण व्यवस्थेची अवस्था झाल्याची खंत अमरावती जिल्ह्यातील श्री क्षेत्र रेवसा येथील संकेत काळे यांनी व्यक्त केली.



राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या शताब्दी महोत्सवाच्या निमित्ताने जमनालाल बजाज प्रशासकीय भवनातील सभागृहात सोमवारी झालेल्या व्याख्यानमालेत ते बोलत होते. यावेळी 'राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांना अपेक्षित विद्यार्थी आणि जीवन शिक्षण' या विषयावर त्यांनी मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी मानव विज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी होते. काळे पुढे म्हणाले की, संपूर्ण जगाने बोध घ्यावा अशा भारत देशात जन्माला आलेला प्रत्येक माणूस उच्च दर्जाचा सुसंस्कारित होता, असे वर्णन प्राचीन ग्रंथांमध्ये करण्यात आले आहे. भारतीय माणसाच्या ज्ञान तसेच वर्तनातून इतरांना शिकायला मिळत होते. या देशात अनेक विद्वान विभूती तसेच महापुरुष जन्माला आले, असे वर्णन राष्ट्रसंतांनी केल्याचे काळे यांनी सांगितले.

सकाळ

## महात्मा बसवेश्वरांनी केला जातीभेदावर प्रहार

### डॉ. गोविंद नांदेडे : विद्यापीठात महात्मा बसवेश्वर व्याख्यानमाला

सकाळ वृत्तसेवा

नागपूर, ता. १२ : नागपूर हे धम्मक्रांतीची भूमी आहे. अशा भूमीत महात्मा बसवेश्वरांची व्याख्यानमाला होणे ही अभिमानाची बाब आहे. बसवेश्वरांनी आयुष्यभर जातीभेद नष्ट करण्याचे काम केले. जातीभेदाने पोखरलेल्या समाजाला १२ व्या शतकात जागृत करण्याचे धाडसाचे काम बसवेश्वरांनी केले, असे प्रतिपादन माजी शिक्षण संचालक डॉ. गोविंद नांदेडे यांनी केले.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या दीक्षांत सभागृहात दादा मनोहरराव कल्लावार स्मृतीप्रित्यर्थ महात्मा बसवेश्वर व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात



नागपूर : व्याख्यानात बोलताना डॉ. गोविंद नांदेडे, व्यासपीठावर उपस्थित डॉ. श्याम कोरेटी व अभय कल्लावार.

आले होते. 'महात्मा बसवेश्वरांच्या कार्याची सद्यःस्थितीतील उपयुक्तता' या विषयावर ते बोलत होते. शिवा संघटनेचे राष्ट्रीय उपाध्यक्ष अभय कल्लावार आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. श्याम कोरेटी व्यासपीठावर उपस्थित होते.

डॉ. नांदेडे म्हणाले, एकविसाव्या शतकात आजही आंतरजातीय विवाहाला विरोध आहे. त्यातून ऑनर किलिंग सारख्या घटना घडल्या आहेत. महात्मा बसवेश्वरांनी त्याकाळी १२ व्या शतकातच आंतरजातीय विवाह घडवून आणला होता. त्यावेळी त्यांनाही विरोधच झाला होता. जाती अंताचे पहिले प्रयत्न तथागत गौतम बुद्धांनी केले. समाजात शांती, समता, बंधुता नांदावी हे बुद्धांचे महान विचार आहेत. बसवेश्वरांचे सुद्धा जातीभेद नष्ट करण्यासाठी प्रयत्न राहिलेले आहेत. देह हेच मंदिर आहे. त्यामुळे मंदिरात जाण्याची गरज नाही. पुरोहितांनी मानव जातींचे खूप नुकसान केल्याचे विचार बसवेश्वरांनी त्याकाळी व्यक्त केले होते. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लाखो अनुयायांना बुद्ध ध[...] दीक्षा देऊन धम्मक्रांती घडविल[...] तशीच बसवेश्वरांनी लिंगायत धर्माची दीक्षा आठशे वर्षापूर्वी [...] असल्याचे डॉ. नांदेडे यांनी सां[...]

माणूस घडविण्याचे काम विद्यापीठातून झाले पाहिजे. मह[...] बसवेश्वर हे १२ व्या शतकात व्यवस्थेविरुद्ध तुटून पडले होते. [...] कार्य आज लोकांपर्यंत पोहोचवि[...] गरज असल्याचे मत अभय कल[...] यांनी प्रास्ताविकातून व्यक्त के[...]

Nagpur, Nagpur-Today
13/07/2024 Page No. 8

## वाकाटकांच्या घुग्गुसगडचा शोधला जाणार इतिहास

म. टा. प्रतिनिधी, नागपूर

पेंच व्याघ्र प्रकल्प, नागपूर विद्यापीठाचे सर्वेक्षण



गडाच्या नोंदी...

लोकमत

## महात्मा बसवेश्वर यांनी आयुष्यभर जातीभेद नष्ट केला

### डॉ. गोविंद नांदेडे : महात्मा बसवेश्वर व्याख्यानमाला



मार्गदर्शन करताना डॉ. गोविंद नांदेडे. व्यासपीठावर उपस्थित मान्यवर.

लोकमत न्यूज नेटवर्क

नागपूर : एकविसाव्या शतकात आजही आंतरजातीय विवाहाला विरोध आहे. त्यातून ऑनर किलिंगसारख्या घटना घडल्या आहेत. महात्मा बसवेश्वरांनी १२ व्या शतकातच आंतरजातीय विवाह घडवून आणला होता. जातीभेदाने पोखरलेल्या समाजाला त्याकाळात जागृत करण्याचे धाडसाचे काम त्यांनी केले. महात्मा बसवेश्वरांनी आयुष्यभर जातीभेद नष्ट करण्याचे काम केले, असे प्रतिपादन माजी शिक्षण संचालक डॉ. गोविंद नांदेडे यांनी केले.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या महाराज बागस्थित दीक्षांत सभागृहात कै. दादा मनोहरराव कल्लावार स्मृतीप्रीत्यर्थ महात्मा बसवेश्वर व्याख्यानमाला पार पडली. या व्याख्यान मालेत 'महात्मा बसवेश्वरांच्या कार्याची सद्यःस्थितीतील उपयुक्तता' या विषयावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी मानव विज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. श्यामराव कोरेटी होते.

डॉ. नांदेडे म्हणाले, भारतामध्ये गौतम बुद्ध यांच्यानंतर पुरोगामी विचाराचे दुसरे प्रचारक म्हणून महात्मा बसवेश्वर यांचे नाव आहे, असे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांगतात.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लाखो अनुयायांना बौद्ध धम्माची दीक्षा देऊन धम्मक्रांती घडविली. तशीच महात्मा बसवेश्वरांनी वीरशैव लिंगायत धर्माची दीक्षा आठशे वर्षांपूर्वी दिली. महात्मा बसवेश्वर यांनी त्यांच्या साहित्यातून कायाकवे कैलास (कठोर परिश्रमाचा) सिद्धांत सांगितला असून, आजच्या युवकांना कठोर परिश्रमाची सवय लावणे काळाची गरज असल्याचे ते म्हणाले.

प्रास्ताविक शिवा अखिल भारतीय वीरशैव युवक संघटनेचे राष्ट्रीय उपाध्यक्ष अभय कल्लावार यांनी केले. संचालन अरुणा भोंडे यांनी केले, तर आभार प्रा. सुषमा कल्लावार यांनी मानले.

Hello Nagpur
Page No. 3 Jul 22, 2024
Powered by: erelego.com

लोकसत्ता

## विद्यापीठाच्या ग्रंथालयात चार लाख पुस्तके

### दरवर्षी ५० हजारांहून अधिक विद्यार्थ्यांना लाभ

लोकसत्ता खास प्रतिनिधी

नागपूर : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या ग्रंथालयाला मोठा गौरवशाली इतिहास असून विविध अभ्यासक्रमाचे विद्यार्थी आणि संशोधकांसाठी ४ लाख २६ हजार १९० पुस्तकांचा मोठा साठा असल्याचे माहिती अधिकारातून समोर आले आहे. विशेष म्हणजे, रामदासपेठ आणि विद्यापीठ परिसरातील वाचनकक्षात दरवर्षी ५० हजारांहून अधिक विद्यार्थी या ग्रंथालयाचा लाभ घेतात.

माहिती अधिकार कार्यकर्ते अभय कोलारकर यांनी विद्यापीठाचे ज्ञानस्रोत केंद्र विद्यापीठ परिसर यांना केलेल्या माहिती अधिकार अर्जाच्या उत्तरातून विविध माहिती समोर आली आहे. विद्यापीठाच्या ग्रंथालयाला मोठा इतिहास आहे. या ग्रंथालयामध्ये अनेक अधिकारी घडले आहेत. खुद्द नागपूर विद्यापीठाला लाभलेल्या अनेक कुलगुरूंनी याच ग्रंथालयात अभ्यास करून आपले करिअर घडवले. या ग्रंथालयामध्ये मोठी आणि अद्ययावत ग्रंथसंपदा आहे. शेकडो संशोधन विद्यार्थी या ग्रंथसंपदेवर निर्भर असतात. त्यामुळे दरवर्षी ग्रंथसंपदेमध्ये मोठी वाढ होणे अपेक्षित होते. परंतु, मागील पाच वर्षांत नागपूर विद्यापीठाच्या ग्रंथालयात नवीन पुस्तकांची विक्री फारच कमी झाल्याचे माहिती अधिकारात दिसून येते. २०२०-२१ या वर्षात विद्यापीठाकडे ४ लाख २२ हजार १४५ पुस्तके होती. या पुस्तकांमध्ये दरवर्षी केवळ १०० ते ५०० पुस्तकांनी वाढ झाली आहे. २०२३-२४ या वर्षात विद्यापीठाकडे ४ लाख २६ हजार १९० पुस्तके आहे. त्यामुळे पाच वर्षात केवळ चार हजार पुस्तकांनी वाढ झाली आहे. मागील वर्षी १८३७ पुस्तकांची विक्री करण्यात आली आहे. विद्यापीठामधील आजी आणि माजी विद्यार्थी स्पर्धा परीक्षेची तयारी करतात. तसेच नेट, सेट या परीक्षेची तयारी करणाऱ्यांचीही संख्या मोठी असते. त्यांच्यासाठी विद्यापीठामध्ये दोन भव्य वाचनकक्ष तयार करण्यात आले आहेत.

रामदासपेठ येथील वाचनकक्षामध्ये मागील वर्षी ३४ हजार ८४३ तर विद्यापीठ शैक्षणिक परिसरातील वाचनकक्षात २४ हजार ७८५ विद्यार्थ्यांनी लाभ घेतला आहे.

### ५० टक्के पदे रिक्त

ग्रंथालयामध्ये ज्ञानस्त्रोत केंद्र संचालक, उपग्रंथपाल, सहायक ग्रंथपाल, प्रशिक्षित ग्रंथालय सहायक, वरिष्ठ ग्रंथालय सहायक, कनिष्ठ ग्रंथालय सहायक, ग्रंथालय परिचय अशी विविध २५ पदे आहेत. यापैकी सध्या १३ पदांवर कर्मचारी कार्यरत आहेत. तर १२ पदे रिक्त असल्याचे माहिती अधिकारातून स्पष्ट झाले.

लोकमत

## वकिली हा समाजात आदर देणारा पेशा

### न्यायमूर्ती वृषाली जोशी : डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालयात पदवी वितरण सोहळा




उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती वृषाली जोशी विचार व्यक्त करताना.

लोकमत न्यूज नेटवर्क

नागपूर : वकिली हा समाजात आदर देणारा पेशा असल्याचे प्रतिपादन उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती वृषाली जोशी यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालयाचा पदवी वितरण समारंभात त्या प्रमुख अतिथी म्हणून बोलत होत्या.

महाराज बागस्थित दीक्षांत सभागृहात आयोजित या कार्यक्रमात महाराष्ट्र व गोवा बार असोसिएशनचे सदस्य ॲड. पारिजात पांडे, विद्यापीठ आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. प्रशांत कडू, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रविशंकर मोर यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

न्यायमूर्ती जोशी यांच्या शुभहस्ते गुणवंत विद्यार्थिनी सोनल भार्गव आणि अक्षता ब्राम्हपुरीकर यांना त्यांच्या आईच्या स्मृतिप्रित्यर्थ प्रत्येकी स्मृतिचिन्ह आणि १०,००० रुपये रोख रक्कम बक्षीस म्हणून देण्यात आले. कार्यक्रमांमध्ये प्रमुख अतिथींच्या हस्ते महाविद्यालयातील गुणवंतांचा सत्कार करीत अन्य विद्यार्थ्यांना पदवी वितरण करण्यात आले.

संचालन हर्षिता पांडे यांनी केले, तर आभार डॉ. उपप्राचार्य डॉ. प्रवीणा खोब्रागडे यांनी मानले. कार्यक्रमाला डॉ. अधरा देशपांडे, डॉ. चिन्मयी निमखेडकर, प्रा. मृण्मयी कुकडे, प्रा. अर्चना प्रांजळे, प्रा. प्रवीणा उराडे, प्रा. ममता गोमासे यांच्यासह शिक्षक कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

Hello Nagpur
Page No. 4 Jul 13, 2024
Powered by: erelego.com

■ राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ : जितेंद्र श्रीवास्तव यांचे 'हमारा समय, समाज और साहित्य' विषयावर व्याख्यान, हिंदी विभाग सभागृह, भाषा भवन, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, अमरावती मार्ग येथे दुपारी १२ वाजता.

लोकमत

## विद्यापीठात लोकमान्य टिळक जयंती साजरी



नागपूर : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, नागपूर विद्यापीठात लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. जमनालाल बजाज प्रशासकीय भवनातील सभागृहात मंगळवारी झालेल्या कार्यक्रमात शताब्दी महोत्सव कक्षाचे विशेष कार्य अधिकारी प्रदीप बिनीवाले व सामान्य प्रशासन विभागाचे सहायक कुलसचिव गणेश कुमकुमवार यांच्या हस्ते लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करण्यात आले. यावेळी जनसंपर्क अधिकारी प्रेमदास वाडकर, यूडीसी श्री शैलेश राठोड, सर्वश्री मनोज मोरे, नितीन खरबडे, योगेश केवटे, रुपेश आतराम, कवडू भोयर, नरेंद्र पवार, अनिल खरे, कार्तिक हरडे, शितल शेटे, आसिफ शेख यांच्यासह अन्य उपस्थित होते.

Hello Nagpur
Page No. 3 Jul 24, 2024
Powered by: erelego.com

तरुण भारत
Apla Nagpur | 2024-07-23 | Page- 3
epaper.tarunbharat.net

## साहित्य हे समाजाचे दस्तावेज

### प्रा. जितेंद्र श्रीवास्तव यांचे प्रतिपादन

◆ नागपूर, २२ जुलै

प्रत्येक कालखंडातील साहित्य हे काळाचा आणि समाजाचा दस्तावेज असते, असे प्रतिपादन ज्येष्ठ कवी, समीक्षक, इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ, दिल्लीचे प्रा. जितेंद्र श्रीवास्तव यांनी येथे केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या हिंदी विभागातर्फे आयोजित विशेष व्याख्यानात ते बोलत होते. 'आपला काळ, समाज आणि साहित्य' हा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता. साहित्याने केवळ वेळेचे मूल्यमापन न करता वेळ आणि समाज समजून घेण्याचा दृष्टिकोन विकसित करणे अपेक्षित आहे. महत्वाचे साहित्य प्रतिकूल काळातच निर्माण होते. कोणत्याही कालखंडातील साहित्य, त्याच्या काळातील आणि समाजाचे पैलू अधोरेखित करते, जे इतर शाखांना लक्षात येत नाही. आपला काळ कितीही कातेरी असो, कितीही विसंगती असो, समाजाला स्वस्थ दृष्टिकोन प्रदान करणे हे साहित्याचे मूलभूत कार्य आहे, असे श्रीवास्तव याप्रसंगी म्हणाले. साहित्याकडे सामाजिक माध्यम म्हणून पाहिले पाहिजे, असे उद्गार व्हीएनआयटीचे राजभाषा अधिकारी एस. पी. सिंग यांनी काढले. हिंदी विभागाचे सहयोगी प्राध्यापक डॉ. संतोष गिन्हे, आयकर विभागाचे सहायक संचालक अनित त्रिपाठी, डाक संचालनालयाचे हिंदी अधिकारी तेजवीर सिंग, डॉ. लखेश्वर चंद्रवंशी यांनीही विचार मांडले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सुमित सिंग यांनी केले.



अतिथींचे स्वागत करताना विद्यापीठाचे पदाधिकारी

प्रास्ताविक हिंदी विभागाचे प्रमुख डॉ. मनोज पांडे यांनी केले. याप्रसंगी प्रा. जागृती सिंग, प्रा. अनुश्री सिन्हा, प्रा. दामोदर द्विवेदी, प्रा. विनय उपाध्याय, ज्ञानेश्वर भेलकर यांच्यासह अनेक संशोधक व विद्यार्थी उपस्थित होते. (तभा वृत्तसेवा)

नवभारत

## छात्र, कर्मचारी, संस्थाएं होंगी सम्मानित

तीन दिनों तक चलने वाले समारोह में विवि के 100 पूर्व छात्रों का सत्कार किया जाएगा. इस बार जीवन साधना पुरस्कार डॉ. चारुदत्त मायी को प्रदान किया जाएगा. आदर्श शिक्षा संस्था पुरस्कार काटोल के शिक्षण प्रसारक मंडल, बलराज अहेर स्मृति पदक परीक्षा विभाग के सामान्य जांच परीक्षा विभाग की अधीक्षक संगीता आत्राम, आदर्श अधिकारी पुरस्कार संजय भोयर, आदर्श शिक्षकेतर कर्मचारी पुरस्कार वर्ग 3 वित्त व लेखा विभाग के उच्चश्रेणी लिपिक मंगेश उताणे, आदर्श शिक्षकेतर कर्मचारी पुरस्कार वर्ग ४ गृहविज्ञान विभाग के चपरासी दिलीप लंगडे, कुलसचिव कार्यालय के दुर्गेशसिंग बैस, आदर्श शिक्षकेतर कर्मचारी पुरस्कार मातृसेवा संघ इंस्टीट्यूट ऑफ सोशल वर्क के वरिष्ठ लिपिक संदीप कोठार व हिस्लॉप कॉलेज के युवराज गजघाटे को दिया जाएगा. आदर्श विद्यार्थी पुरस्कार नितिन मरसकोल्हे, आदर्श छात्रा आश्लेषा खंते, उत्कृष्ट सांस्कृतिक पुरस्कार हिस्लॉप के ब्रायन बेहनूर डोंगरदिवे, तेजस्विनी खोडतकर, उत्कृष्ट एनसीसी कैडेट प्रथमेश चौधरी व तन्नू शर्मा, उत्कृष्ट रासेयो स्वयंसेवक तेजस सोनारे व प्राची बोडे को घोषित किया गया है.

निधन

मनोहरराव न

Nagpur Edition Edition
Jul 30, 2024 Page No. 2
red by: erelego.com

## [...]न उत्साहात साजरा

### विद्यापीठात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

नागपूर : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या प्रवास व पर्यटन विभागाच्यावतीने आंतरराष्ट्रीय व्याघ्र दिवस साजरा करण्यात आला. विभाग प्रमुख डॉ. प्रियदर्शी खोब्रागडे यांनी विद्यार्थ्यांना व्याघ्रदिनाबद्दल माहिती दिली. विभागातील नरेश मेश्राम, दीपक उके आणि रामदास बागडे यांनी व्याघ्रदिनाचे महत्त्व, भारतातील व्याघ्र प्रकल्प, त्या संदर्भातील शासकीय योजना, विदर्भातील व्याघ्र प्रकल्प आणि वाघांची संख्या तसेच पर्यटक आणि त्यांच्यासाठी उपलब्ध सुविधा या विषयासंदर्भात माहिती दिली. या कार्यक्रमाला यशस्वी करण्यात प्रा. मंजुषा डोंगरे, प्रा. शोभना मेश्राम, प्रा. डॉ. अमरदीप बारसागडे, प्रा. परिमल सुरडकर यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.




व्याघ्र दिन कार्यक्रमात सहभागी झालेले विद्यार्थी आणि प्राध्यापक.

लोकसत्ता

## प्राणिशास्त्र विभागात 'वर्मीकंपोस्टिंग युनिट' स्थापन



[लो]कसत्ता प्रतिनिधी

[नाग]पूर : राष्ट्रसंत तुकडोजी [मह]राज नागपूर विद्यापीठाच्या [पदव्]युत्तर प्राणिशास्त्र विभागात [व]र्मीकंपोस्टिंग युनिट' स्थापन [कर]ण्यात आले.

[प्र]ाणिशास्त्र विभागाने या [विष]यावर कार्यशाळा आयोजित [केल]ी होती. यावेळी कार्यशाळेत [वर्मी]कल्चर आणि वर्मीकंपोस्टिंग [युनि]ट कसे स्थापन करावे याबाबत [वर्धा] जिल्ह्यातील सेलू येथील डॉ. [आर].जी. भोयर कला, वाणिज्य व [विज्ञ]ान महाविद्यालयाच्या पदव्युत्तर [प्राणि]शास्त्र विभागातील सहाय्यक [प्राध्]यापिका डॉ. वैशाली बडवाईक [यांन]ी माहिती दिली. या कार्यशाळेअंतर्गत प्राणिशास्त्र विभागाच्या प्रांगणात दोन वर्मीकंपोस्टिंग बेड्स स्थापन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्रा. एस.सी. मासराम यांनी भूषवले. यावेळी विभाग प्रमुख डॉ. व्ही.टी. धुर्वे यांची उपस्थिती होती. विभागप्रमुख डॉ. धुर्वे यांनी डॉ. वैशाली बडवाईक यांचे स्वागत केले. शैक्षणिक विभागातील सर्व कर्मचारी, संशोधक व एम.एस्सी. विद्यार्थ्यांनी वर्मीकंपोस्टिंग बेड्सच्या स्थापनेत सहभाग घेतला. कार्यशाळेदरम्यान 'वर्मीकल्चर आणि वर्मीकंपोस्टिंग' या विषयावर एक अतिथी व्याख्यान आयोजित करण्यात आले. या व्याख्यानात डॉ. वैशाली बडवाईक यांनी विद्यार्थ्यांना समाज व शेतकऱ्यांमध्ये वर्मीकंपोस्टचा जैविक खत म्हणून उपयोगाबद्दल जागरूकता निर्माण करण्याचे आवाहन केले.

SBI भारतीय स्टेट बैंक State Bank of India

अधिकृत अधिकारी- श्री अंजनी कुमार मोनकर
ई-मेल-cmcreditrbo1.akola@sbi.co.in
शाखा मूर्तीजापूर (शाखा कोड-00528) ता. मूर्तीजापूर जिल्हा-अकोला मो. 8318196343

अचल मालमत्ता विक्री अधिसूचना (परिशिष्ट IV-A) (नियम 8 (6))

https://www.mstcecommerce.com
ठिकाण - Murtijapur
दिनांक 25.07.2024

31/07/2024 | Nagpur | Page : 11
Source : https://epaper.loksatta.com

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. जमनालाल बजाज प्रशासकीय भवनातील सभागृहात झालेल्या कार्यक्रमात शताब्दी महोत्सव कक्षाचे विशेष कार्य अधिकारी प्रदीप बिनीवाले व सामान्य प्रशासन विभागाचे सहाय्यक कुलसचिव गणेश कुमकुमवार यांच्या हस्ते



लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करण्यात आले. यावेळी जनसंपर्क अधिकारी प्रेमदास वाडकर, यूडीसी शैलेश राठोड, मनोज मोरे, नितीन खरबडे, योगेश केवटे, रुपेश आतराम, कवडू भोयर, नरेंद्र पवार, अनिल खरे, कार्तिक हरडे, शितल शेटे, आसिफ शेख यांच्यासह अन्य उपस्थित होते.



LOKMAT TIMES

# Guv to attend closing prog of RTMNU centenary

**Cotton scientist Dr C D Mayee to be honoured with Jeevan Sadhana award**

LOKMAT NEWS NETWORK
NAGPUR

The closing ceremony of year long Centenary celebrations of Rashtrasant Tukdoji Maharaj Nagpur University (RTMNU) will be held on Sunday. This was stated by the vice- chancellor of RTMNU Dr Prashant Bokare here on Monday.

Dr Prashant Bokare told mediapersons that the newly appointed governor of Maharashtra C P Radhakrishnan will be the chief guest of the function.

The centenary celebrations will start at Dr Vasantrao Deshpande Hall from 6 pm.



C P Radhakrishnan

The union minister of Road Transport and Highways Nitin Gadkari and deputy chief minister Devendra Fadnavis will be the guests of honour. The Dr Bokare, pro-vice chancellor Dr Sanjay Dudhe and registrar of the university Dr Raju Hivase will be present on the dais.

During the closing ceremony of the centenary year, the university will award Rashtrasant Tukdoji Maharaj Jeevan Sadhana award to a renowned cotton scientist Dr C D Mayee, who is presently serving as president of South Asia Biotechnology Centre (SABC) and vice-president of the National Academy of Agricultural Sciences (NAAS), New Delhi.

The university will also present the best education institute award, best officer and employee of the university and affiliated colleges, Principal Balraj Aher memorial award and also best students award on this occasion.

Earlier on August 2, the university will organise a meet of former employees, professors and head of the departments of the university at 4 pm. Thereafter on August 3, the alumni meet will be held at Dr Vasantrao Deshpande Hall at 10.30 am. The university will felicitate 100 noted alumni at the hands of Supreme Court former Justice Vikas Sirpurkar and union minister Nitin Gadkari. Devendra Fadnavis, former MP Padma Shri Dr Vikas Mahatme, Padma Shri Dr Chandrashekhar Meshram will be present as a chief guests.

**Students to get various awards**

- Fine Arts Department student Nitin Maraskolhe and Statistics Department student Ashlesha Khante will receive best students award for the year 2022-2023.
- A student of Hislop College Dongardive and a students of Vasatrao Naik Government Institut[e] Arts and Social Scien[ce] Tejaswini Khodatkar [will] receive best cultural student award. A stu[dent] of G S College Wardh[a] Prathamesh Chaoud[hari] and Hislop college st[udent] Tannu Sharma will re[ceive] best NCC cadet awar[d]. City premier college student Tejas Sonare [and] LAD college student [Prachi] Bode will be awarde[d] best NSS student aw[ard].

TheHitavada
Nagpur City Line | 2024-07-31 | Page- 7
ehitavada.com

# Maharajbag Zoo, RTMNU celebrate Tiger Day

■ Staff Reporter

TO COMMEMORATE international Tiger Day, a series of activities were organised for M Sc students at Dr Panjabrao Deshmukh Krishi Vidyapeeth College of Agriculture, Maharajbag Zoo, Nagpur, in collaboration with PGTD of Zoology, RTMNU, Kamla Nehru Mahavidyalaya.

Kundan Hate, Member of Wildlife Board, Maharashtra State was the chief guest. The function was presided over by Dr P R Kadu, Dean of Dr Panjabrao Deshmukh Krishi Vidyapeeth College of Agriculture, Nagpur.

Dr V T Dhurvey, Head of Department of Zoology, Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University (RTMNU) and Dr S S Bavaskar, Officer in-charge of Maharajbagh Zoo gave introductory speech.



Dignitaries pose for a group photo at the Tiger Day celebration event.

Both the quiz and poster-making activities saw enthusiastic participation from MSc students. First position was bagged by Sabreen Bano Mansoori, second position by Prerna Lanjewar, Vaibhav Ashtankar and Prachi Lende while the third position was secured by Pooja Kanojiya, Sonal Padole and Payal Malame.

In the MCQ Quiz competition, Pranav Gaikwad secured the first position, Pooja Harinkhede won the second position and the third prize was won by Mr. Aniruddha Chaware. The programme was conducted by Prajakta Tandale, Education Officer, Biologist, Maharajbagh Zoo and Dr Abhijeet Motghare, Medical Officer, Maharajbagh Zoo proposed a vote of thanks.

TheHitavada
Nagpur City Line | 2024-07-31 | Page- 8
ehitavada.com

RTMNU'S CENTENARY CELEBRATIONS

# Closing ceremony to begin on Aug 2

■ Chancellor, Dr Raghunath Mashelkar, Nitin Gadkari, Devendra Fadnavis to grace the occasion

**RTMNU to felicitate 100 eminent alumni**

**Ideal institution, officers, employees**

- Dr Charudatta Mayi - Jeevan Sadhna Award
- Shikshan Prasarak Mandal, Katol - Ideal Education Institute
- Sangeeta Atram (Superintendent of Exam department) - Balraj Aher Memorial Gold Medal
- Sanjay Bhoyar (Superintendent in Academic section) - Ideal Officer
- Mangesh Utane (Finance and Accounts) - Ideal non-teaching employee
- Dilip Langde (Department of Home Science) - Non-teaching Ideal employee
- Durgesh Singh Kewal Singh Bais of Registrar Office - non-teaching Ideal employee
- Sandeep Kothar of MSS Institute Ideal non-teaching employee
- Yuvraj Gajghate, Laboratory Attendant at Hislop college - non-teaching employee of affiliated college

**Ideal Student award**

- Nitin Maraskolhe (PGTD Fine Arts, RTMNU) Ideal boy student
- Ashlesha Khante of Statistics Department - Ideal girl student
- Brian Behesar Dongardive (Hislop College) Best boy student (cultural)
- Tejaswini Khodatkar (Morris College) - Best girl student (cultural)
- Prathamesh Chaudhari (G S College, Wardha) - Best NCC candidate
- Tannu Sharma (Hislop College) - Best NCC candidate
- Tejas Sonare (City Premier College) - Best NSS volunteer
- Prachi Rajendra Bonde (LAD) - Best NSS student

■ Staff Reporter

THE closing ceremony of Rashtrasant Tukdoji Maharaj Nagpur University's centenary celebrations will begin on Friday August 2.

The alumni meeting of teachers and administrative staff will be held on Friday August 2 at 4 pm, the alumni meeting will be held on Saturday August 3 at 10.30 am and the concluding programme will be held on Sunday, August 4 at 6 pm at Dr Vasantrao Deshpande hall, Civil Lines.

The closing ceremony of the Centenary Festival, to be held on Sunday, August 4 at 6 pm, will be attended by Governor of Maharashtra and Chancellor of the University. 'Padma Vibhushan' Dr Raghunath Mashelkar will be the chief guest.

Union Minister Nitin Gadkari, Deputy Chief Minister of Maharashtra Devendra Fadnavis, Vice-Chancellor Dr Prashant Bokare, Pro Vice-Chancellor Dr Sanjay Dudhe, Registrar Dr Raju Hiwase will be present.

The function will witness conferment of Rashtrasant Tukdoji Maharaj Jeevan Sadhana Puraskar, Adarsh Education Institution Award, Adarsh Officer Award, Adarsh Employee Award, Principal Balraj Aher Smriti Gold Medal, Outstanding Student, Ideal Officer award, Ideal Educational Institute.

On Friday, August 2 at 4 pm, a get-together of teachers and administrative staff will be held. Ex-Vice-Chancellor of Kavikulguru Kalidas Sanskrit University Dr Pankaj Chande will be present as the chief guest. The ceremony will be presided over by Dr Prashant Bokare and Dr Sanjay Dudhe. Students and staff will present a cultural program on this occasion.

On Saturday August 3, Justice (retd) Vikas Sirpurkar, Judge of Supreme Court; Union Minister Nitin Gadkari, Guardian Minister of Nagpur Devendra Fadnavis, Padmashri and noted Neurophysician Dr Chandrashekhar Meshram, ex-Rajya Sabha member Dr Vikas Mahatme, will be present. Dr Prashant Bokare will preside over the function and Dr Sanjay Dudhe, Alumni Committee President, ex-Vice Chancellor Dr Muralidhar Chandekar, Committee Secretary Dr Kalpana Pande, Director-in-Charge of Student Development Department Dr Rajesh Singh will be present on the occasion. Nearly 100 former students who have been honored with prestigious positions will be felicitated in this program. Also, on Saturday August 3 at 5 pm, a grand drama 'Krantinayak' based on the life of Rashtrasant Tukdoji Maharaj will be performed at Vasantrao Deshpande Auditorium.

सकाळ

# समारंभानिमित्त माजी विद्यार्थ्यांचा सत्[कार]

विद्यापीठ शताब्दी समारोह समापन — आजी माजी अधिकारी, कर्मचारीही होणार सन्[मानित]

■ सकाळ वृत्तसेवा



सी. डी. मायी | संगीता आत्राम | संजय भोयर | मंगेश उताणे | दिलीप लांडगे | दु[र्गेश बैस]

**समारोपीय समारंभ ४ ऑगस्टला, राज्यपालांची उपस्थिती**

■ राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या शताब्दी महोत्सव समारोप समारंभ ४ ऑगस्टला ... ६ वाजता आयोजित करण्यात येईल. त्यात राज्याचे राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांची प्रमुख उपस्[थिती] ... यावेळी प्रमुख अतिथी म्हणून पद्मविभूषण डॉ. रघुनाथ माशेलकर, विशेष अतिथी म्हणून केंद्रीय मंत्री ... महामार्ग नितीन गडकरी, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे, प्र-कु[लगुरू] ... संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांची उपस्थिती राहणार आहे. या समारंभात राष्ट्रसंत तुकडोजी ... जीवन साधना पुरस्कार, आदर्श शिक्षण संस्था पुरस्कार, आदर्श अधिकारी पुरस्कार, आदर्श कर्मचारी ... प्राचार्य बलराज अहेर स्मृती सुवर्णपदक, उत्कृष्ट विद्यार्थी आदी पुरस्कार प्रदान केले जाणार आहे.

**डॉ. सी.डी. मायी यांना जीवनसाधना**

■ राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जीवन साधना पुरस्काराने यंदा कृषितज्ज्ञ डॉ. सी.डी. मायी यांना सन्मानि[त] ... येणार आहे. याशिवाय प्राचार्य बलराज अहेर स्मृती सुवर्णपदकाने संगीता आत्राम यांना सन्मानित कर[ण्यात येणार] आहे. तसेच आदर्श शिक्षण संस्था पुरस्कार काटोल येथील शिक्षण प्रसारक मंडळ, आदर्श अधिकारी ... विद्यापीठाच्या विद्या शाखेचे अधीक्षक संजय भोयर, आदर्श कर्मचारी पुरस्कार (नागपूर विद्यापीठ - ... श्रेणी) मंगेश उताणे, (नागपूर विद्यापीठ - चतुर्थ श्रेणी) दिलीप लंगडे, दुर्गेश बैस, (महाविद्यालय श्रे[णी] ... श्रेणी) मातृसेवा संघ समाजकार्य महाविद्यालयातील संदीप कोठार, (महाविद्यालय श्रेणी, चतुर्थ श्रेणी) ... महाविद्यालयातील युवराज गजघाटे यांचा समावेश आहे. याशिवाय उत्कृष्ट विद्यार्थी व विद्यार्थिनी म्ह[णून] ... मरसकोल्हे (२०२२-२३), आश्लेषा खंते (२०२२-२३), ब्रेन डोंगरदिवे (२०२२-२३), तेजस्विनी ... (२०२२-२३), प्रथमेश चौधरी (२०२२-२३), तनू शर्मा (२०२२-२३), तेजस सोनारे (२०२३-२४) ... बोडे (२०२३-२४) यांचा समावेश आहे.

नवभारत

# डॉ. मायी को राष्ट्रसंत जीवन साधना पुरस्कार

## 3 दिनों तक चलेगा शताब्दी महोत्सव समापन

■ नागपुर, महानगर संवाददाता. नागपुर विवि के शताब्दी महोत्सव समापन निमित्त पूर्व और वर्तमान शिक्षक व प्रशासकीय कर्मचारी स्नेह सम्मेलन 2 अगस्त को शाम 4 बजे, पूर्व छात्र सम्मेलन 3 को सुबह 10.30 बजे और समापन समारोह का आयोजन 4 अगस्त को शाम 6 बजे सिविल लाइन्स स्थित देशपांडे सभागृह में किया गया है. समापन अवसर पर प्रमुख अतिथि पद्मविभूषण डॉ. रघुनाथ माशेलकर, केंद्रीय मंत्री नितिन गडकरी, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रभारी उपकुलपति डॉ. प्रशान्त बोकारे, प्र-उपकुलपति डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे उपस्थित रहेंगे. इस अवसर पर राष्ट्रसंत तुकड़ोजी महाराज जीवन साधना पुरस्कार, आदर्श शिक्षण संस्था पुरस्कार, आदर्श अधिकारी पुरस्कार, आदर्श कर्मचारी पुरस्कार, प्राचार्य बलराज अहेर स्मृति स्वर्ण पदक, उत्कृष्ट विद्यार्थी आदि पुरस्कार प्रदान किये जाएंगे. यह जानकारी उपकुलपति प्रा.बोकारे ने दी.



Nagpur Edition Edition
Jul 30, 2024 Page No. 2
Powered by: erelego.com

लोकमत समाचार

# भारतीय समाज के सजग प्रहरी थे प्रेमचंद : विजय शर्मा





कार्यक्रम में विचार व्यक्त करते तथा मंचासीन अतिथिगण.

**नागपुर:** राष्ट्रसंत तुकड़ोजी महाराज नागपुर विश्वविद्यालय के हिंदी विभाग की ओर से मुंशी प्रेमचंद की जयंती के उपलक्ष्य में व्याख्यानमाला का आयोजन किया गया. व्याख्यान का विषय 'हमारे समय में प्रेमचंद' था.इस अवसर पर शिवायु आयुर्वेद लि. के प्रबंध निदेशक, साहित्यकार डॉ. विजय शर्मा ने कहा कि प्रेमचंद भारतीय समाज के सजग प्रहरी थे. उनका साहित्य ... भारतीय सामाजिक मूल्यों को अपनी लेखनी के माध्यम से प्रतिष्ठित किया. कार्यक्रम के प्रमुख अतिथि वरिष्ठ पत्रकार आनंद निर्बाण थे. प्रास्ताविक हिंदी विभागाध्यक्ष डॉ. मनोज पाण्डेय ने रखा. आभार सहयोगी प्राध्यापक डॉ. संतोष गिरहे ने माना. संचालन प्रा. जागृति सिंह ने किया. इस मौके पर साहित्यकार अविनाश बागडे, डॉ. संतोष बादल, इंदिरा किसलय ...

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती



# डॉ. बोकारे नागपूर विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू

लोकसत्ता खास प्रतिनिधी

**नागपूर :** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांना कुलपती रमेश बैस यांनी गुरुवारी निलंबित केले. त्यामुळे गोंडवाना विद्यापीठ गडचिरोलीचे कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे यांनी शुक्रवारी नागपूर विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू म्हणून पदभार स्वीकारला. यावेळी कुलसचिव डॉ. राजू हिवसे, परीक्षा व मूल्यमापन मंडळ संचालक डॉ. प्रफुल्ल साबळे, वित्त व लेखा अधिकारी हरीश पालीवाल, उपकुलसचिव संजय बाहेकर, प्रदीप बिनीवाले, गणेश कुमकुमवार उपस्थित होते.

06/07/2024 | Nagpur | Page : 05
Source : https://epaper.loksatta.com

लोकसत्ता

# ‘युवकांना कठोर परिश्रमाची सवय लावणे काळाची गरज’

लोकसत्ता खास प्रतिनिधी

**नागपूर :** महात्मा बसवेश्वर यांनी त्यांच्या साहित्यातून कठोर परिश्रमाचा सिद्धांत सांगितला असून आजच्या युवकांना कठोर परिश्रमाची सवय लावणे काळाची गरज असल्याचे प्रतिपादन माजी शिक्षण संचालक डॉ. गोविंद नांदेडे यांनी केले.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या दीक्षांत सभागृहात कै. दादा मनोहरराव कल्लावार स्मृतिप्रीत्यर्थ महात्मा बसवेश्वर व्याख्यानमाला पार पडली. या व्याख्यानमालेत 'महात्मा बसवेश्वरांच्या कार्याची सद्यस्थितीतील उपयुक्तता' या विषयावर माजी संचालक डॉ. नांदेडे यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला मानव विज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. श्यामराव कोरेटी, शिवा अखिल भारतीय वीरशैव युवक संघटनेचे राष्ट्रीय उपाध्यक्ष अभय कल्लावार उपस्थित होते. डॉ. नांदेडे म्हणाले, भारतामध्ये गौतम बुद्ध यांच्यानंतर पुरोगामी विचाराचे दुसरे प्रचारक म्हणून महात्मा बसवेश्वर यांचे नाव आहे, असे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांगतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लाखो अनुयायांना बुद्ध धम्माची दीक्षा देऊन धम्मक्रांती घडवली. तशीच महात्मा बसवेश्वरांनी वीरशैव लिंगायत धर्माची दीक्षा आठशे वर्षांपूर्वी दिली, याकडेही त्यांनी लक्ष वेधले. प्रास्ताविक अभय कल्लावार यांनी केले. अध्यक्षीय भाषण करताना डॉ. कोरेटी यांनीही महात्मा बसवेश्वर यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला. प्रमुख व्याख्याते यांचा परिचय डॉ. कविता मते यांनी करून दिला. या व्याख्यानमालेचे संचालन अरुणा भोंडे तर आभार प्रा. सुषमा कल्लावार यांनी मानले.

> बसवेश्वरांनी आयुष्यभर जातिभेद नष्ट करण्याचे काम केले . जातिभेदाने पोखरलेल्या समाजाला १२ व्या शतकात जागृत करण्याचे धाडसाचे काम महात्मा बसवेश्वर यांनी केले, अशी माहिती डॉ . गोविंद नांदेडे यांनी दिली .





26/07/2024 | Nagpur | Page : 12
Source : https://epaper.loksatta.com

लोकसत्ता

# विद्यापीठाच्या शताब्दी महोत्सवात शंभर माजी विद्यार्थ्यांचा गौरव

लोकसत्ता खास प्रतिनिधी

**नागपूर :** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या शताब्दी महोत्सव समारोपानिमित्ताने आजी-माजी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी स्नेह मेळावा आणि माजी विद्यार्थी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

३ ऑगस्टला विद्यार्थी मेळाव्याला केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि उमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. यावेळी विद्यापीठातून शिक्षण पूर्ण केल्यानंतर देशासह संपूर्ण जगाच्या विविध भागांमध्ये विविध क्षेत्रांमध्ये सेना, उद्योग, खेळ, पत्रकार, विविध शैक्षणिक क्षेत्रात काम करणारे आणि नामवंत उच्च पदावर विभूषित जवळपास १०० माजी विद्यार्थ्यांचा सत्कार यावेळी करण्यात येणार असल्याची माहिती प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

डॉ. बोकारे म्हणाले, २ ऑगस्टला दुपारी ४ वाजता आजी-माजी शिक्षक व प्रशासकीय कर्मचारी स्नेह मेळावा तर ३ ऑगस्टला सकाळी साडेदहा वाजता डॉ. वसंतराव देशपांडे सभागृहात माजी विद्यार्थी मेळावा होणार आहे. यावेळी सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमूर्ती विकास सिरपूरकर, पद्मश्री डॉ. विकास महात्मे, पद्मश्री डॉ. चंद्रशेखर मेश्राम आदींची उपस्थिती राहणार आहे. पत्रकार परिषदेमध्ये कुलसचिव डॉ. राजू हिवसे उपस्थित होते.

> विद्यापीठाच्या शताब्दी महोत्सवाचा मुख्य समारोप समारंभ ४ ऑगस्टला सायंकाळी ६ वाजता होणार आहे . यावेळी राज्यपाल सी .पी . राधाकृष्णन, पद्मविभूषण डॉ . रघुनाथ माशेलकर उपस्थित राहणार आहेत . यावेळी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जीवन साधना पुरस्कार, आदर्श शिक्षण संस्था पुरस्कार, आदर्श अधिकारी पुरस्कार, आदर्श कर्मचारी पुरस्कार, प्राचार्य बलराज अहेर स्मृती सुवर्णपदक, उत्कृष्ट विद्यार्थी आदी पुरस्कार प्रदान केले जाणार आहे .

**डॉ. मायी यांना जीवनसाधना**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जीवन साधना पुरस्काराने यंदा कृषितज्ज्ञ डॉ. सी.डी. मायी यांना सन्मानित करण्यात येणार आहे. याशिवाय प्राचार्य बलराज अहेर स्मृती सुवर्णपदकाने संगीता आत्राम यांना सन्मानित करण्यात येणार आहे. तसेच आदर्श शिक्षण संस्था पुरस्कार काटोल येथील शिक्षण प्रसारक मंडळ, आदर्श अधिकारी पुरस्कार विद्यापीठाच्या विद्या शाखेचे अधीक्षक संजय भोयर आदर्श कर्मचारी पुरस्कार (नागपूर विद्यापीठ - तृतीय श्रेणी) मंगेश उताणे, (नागपूर विद्यापीठ - चतुर्थ श्रेणी) दिलीप लंगडे, दुर्गेश बैस, (महाविद्यालय श्रेणी, तृतीय श्रेणी) मातृसेवा संघ समाजकार्य महाविद्यालयातील संदीप कोठार, (महाविद्यालय श्रेणी, चतुर्थ श्रेणी) हिस्लॉप महाविद्यालयातील युवराज गजघाटे यांचा समावेश आहे. याशिवाय उत्कृष्ट विद्यार्थी व विद्यार्थिनी म्हणून नितीन मरसकोल्हे (२०२२-२३), आश्लेषा खंते (२०२२-२३), ब्रेन डोंगरदिवे (२०२२-२३), तेजस्विनी खोडतकर (२०२२-२३), प्रथमेश चौधरी (२०२२-२३), तनू शर्मा (२०२२-२३), तेजस सोनारे (२०२३-२४), प्राची बोडे (२०२३-२४) यांचा समावेश आहे.



# भारतीय समाज के सजग प्रहरी थे मुंशी प्रेमचंद : डॉ. शर्मा

**विवि में मनाई गई प्रेमचंद की जयंती**

**केवल समय बदला है**

**यह रहे उपस्थित**





Thu, 01 August 2024
दैनिक भास्कर
https://epaper.bhaskarhindi.com/c/75554710

# युवकांना कठोर परिश्रमाची सवय लावणे काळाची गरज

माजी शिक्षण संचालक डॉ. गोविंद नांदेडे यांचे प्रतिपादन



देशोन्नती

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात प्लेसमेंट ड्राईव्ह

**विविध पदांकरिता विद्यार्थ्यांनी दिल्या मुलाखती**

नागपूर : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात प्रोव्हिंसियल लाईफस्टाईल रिटेल सर्विसेस नागपूर या कंपनीच्या वतीने प्लेसमेंट ड्राईव्ह घेण्यात आला. महाराज बागस्थित विद्यापीठाच्या दीक्षांत सभागृहात हा प्लेसमेंट ड्राईव्ह शुक्रवारी पार पडला. प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे यांनी उपस्थित राहत मुलाखतीसाठी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

प्रोव्हिंसिअल लाईफस्टाईल रिटेल सर्विसेस या कंपनीकडून रिटेल सेल्स एक्झिक्युटिव्ह, कॅशियर, जनसंपर्क अधिकारी, ऑपरेशन एक्झिक्युटिव्ह (ट्रॅव्हल टुरिझम) या पदांकरिता हा प्लेसमेंट ड्राईव्ह राबविण्यात आला. प्लेसमेंट ड्राईव्हकरिता एकूण १३८ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती तर ६० विद्यार्थी प्रत्यक्ष उपस्थित होते. कंपनीच्या एचआर संजीवनी कटांगडे व वर्षा झा यांच्याकडून मुलाखत प्रक्रिया राबविण्यात आली. यावेळी विद्यापीठाचे रोजगार व प्रशिक्षण अधिकारी डॉ. भूषण महाजन यांची उपस्थिती होती. मुलाखतीनंतर रिटेल सेल्स एक्झिक्युटिव्ह पदाकरिता १०, कॅशियर पदाकरिता ३, जनसंपर्क अधिकारी एक व ऑपरेशन एक्झिक्युटव्ह (ट्रॅव्हल टुरिझम) एक उमेदवाराची निवड केली जाणार आहे.



Nagpur Edition Edition
Jul 27, 2024 Page No. 8
Powered by: erelego.com

लोकसत्ता

# विद्यापीठात आंतरराष्ट्रीय व्याघ्र दिन उत्साहात

**प्रवास व पर्यटन विभागाचे आयोजन**

लोकसत्ता प्रतिनिधी

**नागपूर :** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात आंतरराष्ट्रीय व्याघ्र दिन उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यापीठाच्या प्रवास व पर्यटन विभागाच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

नागपूर ही भारतातील वाघांची राजधानी आहे. वाघांचे पर्यटन क्षेत्रातील महत्त्व, त्यांना बघावयास येणारा राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पर्यटक आणि या पर्यटनातून विदर्भाचा होणारा विकास यांना लक्षात घेता प्रवास व पर्यटन विभाग दरवर्षी व्याघ्र दिवस साजरा करतो, असे विभाग प्रमुख डॉ. प्रियदर्शी खोब्रागडे म्हणाल्या. पदवी तृतीय सत्रांमधील विद्यार्थी नरेश मेश्राम, दीपक उके आणि रामदास बागडे यांनी व्याघ्र दिनाविषयी विविध विषयांसंदर्भात माहिती दिली.

या कार्यक्रमाला यशस्वी करण्यात प्रा. मंजूषा डोंगरे, प्रा. शोभना मेश्राम, प्रा. डॉ. अमरदीप बारसागडे, प्रा. परिमल सुरडकर यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.



31/07/2024 | Nagpur | Page : 10
Source : https://epaper.loksatta.com



ई मासिक विद्यासंवाद

जुलै २०२४| आवृत्ती-१३

## विद्यापीठ गीत

या भारतात बंधुभाव नित्य वसू दे ।
दे वरचि असा दे ।
हे सर्व पंथ-संप्रदाय एक दिसू दे ।
मतभेद नसू दे ।। धृ.।।

नांदोत सुखे गरीब-अमीर एकमतांनी ।
मग हिंदु असो ख्रिश्चन, वा हो इस्लामी ।
'स्वातंत्र्यसुखा' या सकलांमाजि वसू दे ।
दे वरचि असा दे ।। १ ।।

सकळांस कळो 'मानवता, राष्ट्रभावना' ।
हो सर्वस्थळी मिळुनि 'समुदाय-प्रार्थना' ।
उद्योगि तरुण वीर, शीलवान दिसू दे ।
दे वरचि असा दे ।। २ ।।

हा जातिभाव विसरुनिया एक हो आम्ही ।
अस्पृश्यता समूळ-नष्ट हो जगातुनी ।
खळ-निंदका-मनीहि 'सत्य-न्याय' वसू दे ।
दे वरचि असा दे ।। ३ ।।

सौंदर्य रमो घरघरांत स्वर्गियापरी ।
ही नष्ट होऊ दे विपत्ती, भीति बोहरी ।
तुकड्यास सदासर्वदा सेवेस कसू दे ।
दे वरचि असा दे ।। ४ ।।

**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज**




**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर**

जमनालाल बजाज प्रशासकीय भवन, महात्मा जोतिबा फुले शैक्षणिक परिसर, कॅम्पस चौक ते अंबाझरी टी-पॉईंट मार्ग, नागपूर-४४० ०३३.
दूरध्वनी : ९१-७१२-२९५६३०४ ईमेल : registrar@nagpuruniversity.nic.in वेबसाईट : www.nagpuruniversity.ac.in